RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१७ शनिवार जानेवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २३२
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## भाजपची सलग दुसऱ्यांदा बाजी



■ पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत 128 पैकी भारतीय जनता पक्षाचे तब्बल 85 उमेदवार विजयी झाले. भाजपाने सलग दुसऱ्यांदा महापालिकेची सत्ता काबीज केली आहे. तर, फेब्रुवारी 2017 ला हातातून निसटलेली सत्ता ताब्यात घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर भ्रष्टाचाराचे असंख्य आरोप करत शहर पिंजून काढले. मात्र, पिंपरी-चिंचवड शहराने राष्ट्रवादीला पुन्हा नाकारले. एकूण 36 जागा राखलेल्या राष्ट्रवादीला सलग दुसऱ्यांदा विरोधी बाकावर बसण्याची नामुष्की आली आहे.

## प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

■ राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत. विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा, राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे. महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना, आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोण ही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा आणि सबंध महाराष्ट्राचे आभार.

## मनापासून आभार मानतो - शाह

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीला मिळालेल्या प्रचंड विजयावरून असे दिसून येते की देशाच्या कानाकोपऱ्यातील जनतेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या विकास धोरणावरच विश्वास आहे. हे ऐतिहासिक यश म्हणजे राज्यातील महायुती सरकारने केलेल्या विकास आणि लोककल्याणकारी कामांवर जनतेचा शिक्का आहे. या प्रचंड पाठिंब्याबद्दल महाराष्ट्रातील जनतेचे मनापासून आभार मानतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजप-शिवसेनेतील सर्व कार्यकर्त्यांचे या विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन.

# मुंबईत महापौर आमचाच !

## विकासाच्या अजेंड्यावर जनतेची मोहोर

▸विदर्भ केसरी। ठाणे :

**राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना–भाजप महायुती बहुमताच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, राज्यभरातील अनेक महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**





ठाणे, कल्याण–डोंबिवली, संपूर्ण एमएमआर आणि मुंबईत महायुतीने जोरदार मुसंडी मारली असल्याचे त्यांनी सांगितले. ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाले असून, एमएमआर परिसरातही चांगल्या जागा मिळाल्या आहेत. मुंबईतही शिवसेना–भाजप महायुतीचा महापौर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बहुमताच्या अगदी जवळ पोहोचलो असून, राज्यात अनेक ठिकाणी महायुती सत्ता स्थापन करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान काही ठिकाणी भावनिक मुद्दे, भ्रष्टाचाराचे आरोप आणि विविध प्रकारचा प्रचार करण्यात आला. मात्र, मुंबईकरांनी आणि राज्यातील मतदारांनी भावनिकतेपेक्षा विकासालाच कौल दिला आहे. विकासविरोधी भूमिका घेणाऱ्यांना जनतेने नाकारले असून, विकास हाच ब्रँड जनतेने स्वीकारला असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने (उबाठा) १५० हून अधिक जागा लढवून सुमारे ६० जागा जिंकल्या, मात्र एकंदरीत जनतेने विकासाच्या अजेंडालाच पाठिंबा दिल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्रात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता अशा ट्रिपल इंजिन सरकारचा मुंबईला मोठा फायदा होणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना, त्या प्रवासात मुंबईचा मोठा वाटा असावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईला जागतिक दर्जाचे, जगाला हेवा वाटेल असे आंतरराष्ट्रीय शहर बनवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या साडेतीन वर्षांत मुंबईसाठी करण्यात आलेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत मुंबईतील सर्व प्रमुख रस्ते काँक्रीटचे करण्यात येणार असून, शहर खड्डेमुक्त झाल्याचे नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळेल. मुंबईत सात ठिकाणी सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) उभारले जात असून, यामुळे प्रदूषणमुक्त मुंबईकडे मोठे पाऊल टाकले जाईल. मेट्रो २, मेट्रो ३ आणि इतर मार्गांचे जाळे पूर्ण करण्यासाठी काम वेगात सुरू असून, पूर्वी रखडलेले प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यात आले आहेत.

## मुंबईकरांनी अन्य ब्रँडला नाकारले - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ बीकेसी आणि कुर्ला परिसरात नवीन 'अँड-फ्रेंड' ट्रान्सपोर्ट सिस्टीम उभारली जात असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत नवीन वाहतूक पर्याय म्हणून पॉड टॅक्सीचा प्रयोग सुरू करण्यात आला असून, ठाणे–साकेत–गायमुख–फॉन्ट्रान मार्गामुळे ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. गोरेगाव–मुलुंड लिंक रोड, बोरिवली टनेल आणि रिंग रोड प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक अधिक सुलभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## २५ महापालिकांवर भाजप महायुतीचा भगवा

▸विदर्भ केसरी। मुंबई :



राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीबाबत एक्झिट पोलसनी वर्तवलेले अंदाज बव्हंशी खरे ठरले असून, भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने या निवडणुकांत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तब्बल २५ महापालिकांवर महायुतीने सत्ता मिळवत ठाकरे बंधुंसह पवार काका पुतण्याला दणका दिला. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्रासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भाजप आणि शिवसेनेचा दबदबा ठळकपणे दिसून आला.

राजधानी मुंबई महापालिकेत महायुतीने निर्णायक आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. भाजप ९० जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, शिवसेनेला २८ जागा मिळाल्या आहेत. मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या उबाठा गटाला ५७, तर राज ठाकरेंच्या मनसेला ९ जागांवर समाधान मानावे. काँग्रेसला अनपेक्षित १५ जागा मिळाल्या. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची स्थिती मर्यादित दिसून आली. रस्ते, रेल्वे, मेट्रो, पुनर्विकास, स्वच्छता आणि पाणीपुरवठा यांसारख्या मुद्द्यांवर मुंबईकरांनी विश्वास दाखवला असून, बहुपक्षीय लढतीतही महायुतीने बाजी मारली आहे.

ठाणे महापालिकेत शिवसेनेने ५५ तर भाजपने २५ जागा जिंकत सत्तेवर पकड मजबूत केली आहे. नवी मुंबईत भाजपने ६६ जागा जिंकून स्वबळावर सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. या ठिकाणी शिवसेनेला ४२ जागा मिळाल्या. मीरा-भाईंदरमध्ये भाजपने ७४ जागांसह एकहाती सत्ता मिळवली, तर शिवसेना आणि इतर पक्ष पिछाडीवर राहिले. कल्याण-डोंबिवलीत शिवसेना (५१) आणि भाजप (४८) यांनी मिळून महायुतीचा किल्ला अबाधित ठेवला. उल्हासनगरमध्ये भाजप (३८) आणि शिवसेना (३६) यांची सरशी झाली, तर भिवंडी-निजामपूरमध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवून पुढे असली तरी सत्ता स्थापनेचा मार्ग त्यांच्यासाठी खडतर दिसून येत आहे

## मराठवाड्यापासून मुंबईपर्यंत ओवेसींची मुसंडी, MIMचा मोठा उदय

▸विदर्भ केसरी।

मुंबईसह राज्यातील 29 महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल स्पष्टपणे दिसून येत आहेत. या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक जागा मिळताना दिसत असल्या तरी, या निकालातील सर्वात ठळक बाब म्हणजे असदुद्दीन ओवेसी यांच्या नेतृत्वाखालील एमआयएमने केलेली अभूतपूर्व मुसंडी. भाजप व पारंपरिक प्रादेशिक पक्षांबरोबरच आता एमआयएम हा महापालिका राजकारणातील एक महत्त्वाचा घटक ठरत असल्याचं या निकालांमधून अधोरेखित झालं आहे. राज्यातील 29 पैकी 13 महापालिकांमध्ये एमआयएमचे एकूण 95 उमेदवार विजयी झाले असून, हा आकडा पक्षासाठी ऐतिहासिक मानला जात आहे.

एमआयएमची कामगिरी केवळ मराठवाडा किंवा मुस्लिमबहुल भागांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर या पक्षाने मुंबईसारख्या महानगरातही ठळक उपस्थिती नोंदवली आहे. विशेष बाब म्हणजे मुंबईतील काही प्रभागांमध्ये एमआयएमने थेट दिग्गज आणि पारंपरिक राजकीय गटांचे गणित बिघडवले आहे. अबू आझमी यांच्या समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या मानखुर्द परिसरात एमआयएमने विजय मिळवत मोठा राजकीय धक्का दिला आहे. मुंबईतील हा निकाल पाहता, एमआयएम आता केवळ पर्यायी पक्ष न राहता थेट स्पर्धक म्हणून पुढे येत असल्याचं चित्र स्पष्ट झालं आहे. मुंबई महानगरपालिकेत एमआयएमने सहा जागांवर विजय मिळवला आहे. या विजयी उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक 134 मधून मेहजबिन खान, 136 मधून जमीर कुरेशी, 137 मधून समीर पटेल, 138 मधून रोशन शेख, 139 मधून शबाना शेख आणि 145 मधून खैरुनिसा हुसेन यांचा समावेश आहे. या निकालांमुळे मुंबईतील राजकीय समीकरणांमध्ये लक्षणीय बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः समाजवादी पक्षाला मिळालेल्या धक्क्यामुळे अल्पसंख्याक मतदारांच्या राजकीय पसंतीत बदल होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## बाळासाहेब ठाकरेंचे आशीर्वाद पाठीशी

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि महायुतीची सत्ता येत आहे. सर्वांचे लक्ष लागलेल्या मुंबईच्या महापालिकेतही जी काही वाटचाल सुरू आहे, त्यानुसार पूर्ण बहुमत महायुतीलाच मिळणार आहे. जसे आता अध्यक्षांनी सांगितले की आपण या निवडणुकीत विकासाचा अजेंडा घेऊन गेलो. याच विकासाच्या अजेंडाला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. लोकांना विकास हवा आहे म्हणून त्यांनी आपल्याला निवडून दिले आहे. तसेच या निकालाने आणखी एक गोष्ट स्पष्ट केली आहे, जनतेचा विश्वास हा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आहे. तसेच बाळासाहेब ठाकरे यांचेही मी स्मरण करतो, कारण त्यांचा आशीर्वाद हा आपल्याच पाठीशी होता, असेही फडणवीस म्हणाले.

## राज्यातील २२ मनपात मनसेला भोपळा



### मनसेचा मोठ्या शहरांत दणदणीत पराभव

■ आपल्या राजकारणात नेहमी मराठी आणि स्थानिक विरुद्ध बाहेरचे, असा मुद्दा मांडणाऱ्या मनसेला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. राज्यातील २२ शहरांत मनसेला एकही जागा मिळालेली नाही. एकूणच पक्ष दहाच्या आकड्यातही पोहोचताना दिसत नाही.

### 'या' ठिकाणांवर इंजिन सुरूच झाले नाही

■ पुणे, संभाजीनगर, कोल्हापूर, सांगली-मिरज, मीरा-भाईंदर, वसई-विरार, भिवंडी, पनवेल, नागपूर, परभणी, जालना, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, मालेगाव, जळगाव, धुळे, इचलकरंजी, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर येथे मनसेचा खातेही उघडलेले नाही.

▸विदर्भ केसरी। मुंबई :

आज महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकांचे निकाल लागले. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार, बहुतांश ठिकाणी भाजपने बहूमत मिळवले आहे. यात मुंबई मनपाची देशभरात चर्चा सुरू होती. या निवडणुकीच्या निमित्ताने दोन दशकांनंतर ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळेच, उद्धवसेना आणि मनसे किती जागा जिंकणार, याकडेच सर्व राज्याचे लक्ष लागून होते.

मुंबई मनपात प्रथमच भाजपला बहुमत मिळण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. तर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांची कामगिरी अतिशय निराशाजनक ठरली आहे. मुंबई मनपात उद्धवसेना ६० च्या आसपास जागा जिंकताना दिसत आहे, तर मनसेला दुहेरी आकडाही गाठता आलेला नाही.

## काँग्रेसचे ५ शहरांत महापौर तर ३५० नगरसेवक : सपकाळ

▸विदर्भ केसरी। मुंबई :

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेले यश समाधानकारक नसले तरी यश अपयशाची पर्वा न करता आम्ही वैचारिक लढाई लढलो. जनतेचा विश्वास व कार्यकर्त्यांचा निर्धाराचा लढा या जोरावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत आहे. पाच शहरांत काँग्रेसचा महापौर तर ३५० नगरसेवक आणि १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ असे चित्र आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, संक्रातीच्या पर्वावर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेस राज्यात दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. जेथे शक्य आहे तेथे स्वबळावर तर काही ठिकाणी आघाडी करून काँग्रेस पक्षाने वैचारिक व संघटनात्मक वाढीसाठी निवडणूक लढली. सत्ताधारी भाजपा महायुतीने पैशाचा प्रचंड वापर केला, बोगस मतदान झाले, कुठलीही तडजोड न करता भाजपच्या बुलडोझरसमोर काँग्रेस कार्यकर्ता निर्धाराने उभा राहिला. हा कार्यकर्त्यांचा विजय असून लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे, विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. हा काळ संघर्षाचा, वैचारिक लढाईचा आहे आणि काँग्रेस ही लढाई लढण्यास कटीबद्ध आहे. अपयशाने खचून न जाता पुढच्या लढाईसाठी आम्ही सज्ज आहोत असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### भाजपाचे यश फिक्सिंगमुळे

■ मुंबईत भाजपाला मिळालेले यश हे फिक्सिंगचा भाग आहे. प्रभाग रचनेपासून पाडू नावाच्या मशिनपर्यंत व शाईचा घोळ हा सर्व फिक्सिंगचा खेळ होता. निवडणूक आयोगाने सावरासावर करणे बंद करावे तसेच भाजपाच्या इशाऱ्यावर चालणे बंद केले पाहिजे. भाजपाकडे कसलीही नैतिकता, लाज राहिलेली नाही. लोकशाही खरोखरच संकटात आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही, पाकिट वाटप, बोगस मतदार, उमेदवारांची पळवापळवी, व निवडणूक आयोगाचा गलथान कारभार हे सर्व पाहता फ्रि अँड फेअर निवडणुका होत नाहीत हे स्पष्ट दिसले, अशी टीका त्यांनी केली.

## नागपुरात कमळ फुलले, पण भाजप, काँग्रेसचे दावे फसले

### काही प्रभागातील बंडखोरी, एमआयएमचा धक्कादायक निकाल

▸विदर्भ केसरी। नागपूर :



अखेर अपेक्षेप्रमाणे चौथ्यांदा उपराजधानीतील नागपूर महापालिकेत भाजपची बहुमतासह सत्ता आली. विकासाचे कमळ फुलले. मात्र, भाजपने 120 जागांचा तर काँग्रेसने मिशन 100 असे केलेले दावे काही प्रभागातील बंडखोरी, एमआयएमच्या धक्कादायक निकालांनी फसले.

शहरातील दहा झोनच्या मतमोजणी केंद्रावर आज शुक्रवारी सकाळी सुरू झाली. चार सदस्यीय प्रभाग असल्याने सायंकाळी 6 पर्यंत निकाल फारसे जाहीर झालेले नसले तरी भाजप बहुमतासह पुन्हा सत्तेत येणार हे स्पष्ट झाले. गेल्यावेळी 108 जागा मिळाल्या. यावेळी 120 जागांचा दावा केला गेला मात्र तो फसला. शिंदे सेनेला आठ जागा दिल्या गेल्या.

मात्र, यातील पाच उमेदवार भाजपचेच होते. 32 लोकांना पक्षाने निलंबित करूनही काही ठिकाणी बंडखोरीचा फटका बसल्याचे आकडे सांगतात. दुसरीकडे धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन टाळत बहुतांशी प्रभागात काँग्रेस - भाजप अशा थेट लढती झाल्या. काँग्रेसला फायदा झाला. अनपेक्षितपणे एआयएमआयएम आणि मुस्लिम लीगने धक्कादायक विजय नोंदवित काँग्रेस,भाजपला दूर सारले. गेल्यावेळी बसपाला दहा जागा मिळाल्या यावेळी बसपा,वंचित,आपची पिछेहाट दिसली.

काँग्रेसने नवख्या उमेदवारांच्या माध्यमातून स्वबळावर लढत भाजपला थेट लढत दिली. महायुतीत शिवसेना शिंदे गटाची जागावाटपासोबतच निकालातही घसरण झाली. उबाठाने दोन परंपरागत जागा जिंकल्या तर राष्ट्रवादी काँग्रेसची,घड्याळाची टिकटिक पुन्हा एकमेव विजयाने निष्प्रभ ठरली. शरद पवार गटाची तुतारी स्वतंत्र लढूनही वाजली नाही. माजी आमदार प्रकाश गजभिये शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे पराभूत झाले. आप,एमआयएमने काही प्रभागात निर्णायक क्षणी आश्चर्यकारकरित्या मारलेली जोरदार मुसंडी राजकीय पक्ष, विश्लेषकांना देखील विचार करायला लावणारी ठरली.

### काय आहे संभाव्य संख्याबळ ?

■ सायंकाळी सातच्या सुमारास नागपुरात 38 प्रभागातील एकंदर 151 जागांपैकी भाजप 103 (गेल्यावेळी 108 जागा) काँग्रेस 33 (गेल्यावेळी 29) ,शिवसेना शिंदे गट 2, उबाठा शिवसेना 2, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा 1 आणि प्रथमच निवडून आलेले एआयएमआयएम 7, मुस्लिम लीग 4 अशी आघाडी कायम होती. अनेक प्रभागात भाजप काँग्रेस काट्याची लढत सुरू होती.

## जनतेचा कौल हा सर्वोच्च...: अजित पवार

▸विदर्भ केसरी। पुणे :



"जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो. विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचं मी मनापासून अभिनंदन करतो, पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो," अशा शब्दांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर महानगरपालिका निवडणुकीतील निकालावर प्रतिक्रिया दिली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं खात्रीनं स्पष्ट करतो, असेही त्यांनी नमूद केले आहे.

यश मिळवलेल्या सर्व उमेदवारांनी आपापल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत, विकास आणि लोककल्याणाच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्याचबरोबर जे विजयी होऊ शकले नाहीत, त्यांनीही निराश न होता जनतेसाठी कार्यतत्पर राहावं, केंद्रस्थानी नेहमी जनतेचं भलं आणि जनतेसाठी अखंड कार्यरत राहणं हेच ध्येय ठेवावं, असं आवाहन करतो, असेही त्यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# चंद्रपुरात काँग्रेस व मित्रपक्षाचाच महापौर बसेल

## * खासदार प्रतिभा धानोरकर व सुभाष धोटे यांचा दावा : स्वखुशीने आल्यास बंडखोरांसाठीही दारे उघडी

**विदर्भ केसरी। चंद्रपूर,**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत 27 जागांवर विजय प्राप्त करीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. तसेच मित्रपक्ष असलेल्या जनविकास आघाडीच्या 3 जागा धरून आम्ही 30 जागा मिळविल्या आहे आणि बहुमताच्या अगदी जवळ आहोत. शिवाय आमच्या विचारांच्या अन्य पक्षांशी बोलणी करून आम्ही नक्कीच महापालिकेवर आमचा महापौर बसवू, अशी घोषणा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शुक्रवारी सायंकाळी येथे झालेल्या पत्रपरिषदेत केली.

यावेळी आ. सुधाकर अडबाले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे, तर शहराध्यक्ष संतोष लहामगे, विनोद दत्तात्रय, रामू तिवारी आदी उपस्थित होते. खा. धानोरकर पुढे म्हणाल्या, लातूरनंतर अवघ्या महाराष्ट्रात आम्ही चंद्रपूर एकहाती जिंकले आहे. गत 2017 च्या निवडणुकीत



आमच्या येथे अवघ्या 12 जागा होत्या. आता 27 जागा झाल्या आहेत. शिवाय मित्रपक्षाचे मिळून 30 जागी आम्ही विजयी झालो आहोत. आमच्या जागा दुपटीपेक्षा जास्तीने वाढल्या असून, जनतेने भाजपाला नाकारल्याचे हे द्योतक आहे, असा आरोपही त्यांनी केला.

मी स्वतः, आमदार विजय वडेट्टीवार, सुभाष धोटे आणि अन्य पदाधिकारी येथे तळ ठोकून होतो. मतदारांनाही बदल हवा होता. जागा वाटपातही आमच्याकडे घोळ झाला नाही. प्रवीण पडवेकर यांना एबी फार्म पाठवला होता. पण त्यांनी अर्जच भरला नाही. नंदू नागरकर यांनाही काँग्रेसचा एबी फार्म पाठवला होता. पण त्यांनी तो स्वीकारला नाही आणि अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. ते विजयी झाले आहेत. बंडखोर असले तरी ते स्वखुशीने परत येत असतील तर त्यांच्यासाठी पक्षाची दारे उघडी आहेत, अशीही ग्वाही खा. धानोरकर यांनी यावेळी दिली. चंद्रपूर शहरातील प्रश्न बरीचे आहेत. ते आम्ही सर्व जण मिळून सोडवण्याचा प्रयत्न करू. या विजयाने आमच्यात मोठा उत्साह आहे, असेही त्या म्हणाल्या.

### आ.विजय वडेट्टीवार यांनी अनुपस्थिती

**■ या पत्रपरिषदेला अपक्ष आमदार सुधाकर अडबाले हेही होते. मात्र, काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार अनुपस्थित होते. खा. धानोरकर यांनी यशात त्यांच्याही नावाचा उल्लेख केला असता, तर या दोन्ही नेत्यांमध्ये विस्तवही जात नसल्याची बाब विजयानंतरही दिसली. ते या संयुक्त पत्रपरिषदेत आलेच नाहीत. त्याबाबत प्रश्न विचारला असता, ते बहुतेक नागपूरला आहेत, असे सुभाष धोटे यांनी सांगितले.**

### जनतेचा कौल मान्यः आमदार किशोर जोरगे-वार

**चंद्रपूर महानगरपालिकेत आम्हाला जे यश अपेक्षित होते ते मिळाले नाही, हे खरे आहे. अनेक अशा जागा आहेत जेथे आम्हाला विजय प्राप्त होईल असे वाटले होते. त्या जागा अगदीच थोड्या फरकाने आम्ही गमावल्या. त्यामुळे आम्हाला त्या ठिकाणी पराभवाचा सामना करावा लागला. तरीही जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य आहे. पक्ष स्तरावर आम्ही सर्व प्रमुख नेते एकत्र येऊन या निकालाचे चिंतन करू आणि येत्या काळात नव्या दमाने, नव्या ताकदीने सामोरे जाऊ. चंद्रपूर महानगराच्या जनतेची सेवा आम्ही करीत आलो आहोत आणि करीतच राहू, अशी प्रतिक्रिया आमदार किशार जोरगेवार यांनी तभाला दिली**

# अग्रलेख

## विकासाला कौल

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात संपूर्ण भारतात सुरू असलेल्या विकासपर्वाला, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस देत असलेल्या गती-शक्तीला मुंबईसह राज्यातील महानगरांनी सकारात्मक कौल दिला आहे. 'अंधेरा छटेगा, सुरज निकलेगा, कमल खिलेगा' हे वाक्य उच्चारत ज्या महानगरात भाजपची स्थापना झाली होती, त्या मुंबईचा प्रथम महापौर भाजपचा होईल. हा पाडाव शिवसेनेच्या ठाकरे कुटुंबाच्या सहाय्याने नव्हे तर भाजपने नगरसेवकांचे शतक करत स्वतःच्या ताकदीवर गाठला आहे. 2014 पासून नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या विकासाला देवेंद्र फडणवीस यांनी जोड दिली. डबल इंजिनचे सरकार आपल्या शहरात, आपल्या गावात आणि आपल्या महानगरात अधिक शक्तीने धावावे ही महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे निकालातून दिसते. आर्थिक राजधानी मुंबईत अस्मितांच्या भाषिक राजकारणाऐवजी विकासाचे भविष्यगामी सत्ताकारण अधिक पसंत असल्याचे मतदारांनी दाखवून दिले. 2019 साली भाजप आणि शिवसेनेचा एकत्रित विजय झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना नाकारले गेलेले मुख्यमंत्रिपद ही एक दुखरी नस. या अध्यायाची परतफेड करणारे अनेकविध 'कार्यक्रम' भाजपने हिशेब चुकता करायला प्रत्यक्षात आणले. त्याची समाप्ती मुंबई महापालिका निवडणूक असेल हे स्पष्ट होते. खरे तर महाराष्ट्र आणि मुंबईवर भाजपने कायम शिवसेनेच्या सहाय्याने राज्य केले. हा आधार नाहीसा झाल्यावर दोघांचे काय झाले? तर शिवसेनेला महापौरपद गमवावे लागले आणि भाजप महापौरपद मिळवेल असे दिसते. महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहर असलेल्या जवळपास प्रत्येक ठिकाणी भाजपचा विकास पसंत असल्याचा कौल जनतेने दिलेला आहे. हा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान आहे, तसेच भाजपच्या संघटनात्मक बांधणीचे यश मानावे लागेल. विकासाचे राजकारण करत शहरांचे चित्र पालटून देणारी मेट्रो, उत्तम नगर योजना, सांडपाणी व्यवस्थापन, गरिबांना घरे, मध्यमवर्गीयांना उत्तम प्रवास अशा अनेक विविध योजना फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने कार्यान्वित केल्या. त्याची पावती या निकालांनी दिली, असे म्हणणे योग्य ठरेल. कोणताही निकाल हा नेत्याची राजकारणावरची पकड स्पष्ट करून दाखवतो, तसेच त्याला अनेकविध निर्णय घ्यायला प्रेरणा देत असतो. या निकालाने दिलेला जनतेचा हा कौल विनम—पणे स्वीकारून महाराष्ट्राच्या विकासाच्या योजना गावोगावी पोहोचवण्याचे शिवधनुष्य देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना उचलावे लागणार आहे.हे कार्य ते कशाप्रकारे करतात यावर त्यांची भविष्यातील वाटचाल अवलंबून राहीलच. शिवाय जातीपातीच्या-धर्मांच्या वादात अडकलेल्या राज्याला आता या छोट्या लढायांऐवजी विकासाची कास पत्करावी लागेल. मुंबईच्या विविध भागांमध्ये शिवसेना हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेला ब—ँड आजही ताजा आणि स्वीकारार्ह असल्याचेही निकालांनी मराठीबहुल भागात दाखवून दिले. बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा हा एकनाथ शिंदेंकडे नसून तो उद्धव आणि राज या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींकडेच असल्याचे मुंबईत निकाल दाखवतात. उद्धव ठाकरे यांनी दुरावलेले बंधू राज ठाकरे यांना समवेत घेऊन मराठी मतांची मोट बांधली. 20 जागांची घसरण झाली असली तरी आम्ही मराठी माणसाचा आवाज आहोत हे ठाकरे सांगू शकतील. आता त्यांनी मराठी माणसाला नवी स्वप्ने दाखवावीत ही अपेक्षा. प्रत्येक निकाल काहीतरी शिकवून जात असतो. तसा धडा तेथील राजकीय पक्ष घेऊ शकतात का हे त्यांनी ठरवायचे असते. राज्याच्या अन्य भागांमध्येही भाजपला ज्या प्रकारे प्रतिसाद मिळाला ते लक्षात घेता महानगरीय मानसिकता ही मोदी-फडणवीस यांच्या मागे उभी असल्याचेही या कौलाने दाखवून दिले. कोणताही निकाल हा जबाबदाऱ्या घेऊन येत असतो. राज्यात अत्यंत वेगाने वाढलेली शहरे मोठ्या प्रमाणात बकाल आहेत. वाहतूक समस्या, सांडपाणी व्यवस्थापन, गृहनिर्माण, कार्यालयांमध्ये जाताना नागरिकांना सोसावे लागणारे त्रास हे सगळे मुद्दे सुटले तर विकासाच्या यात्रेत नागरिक स्वतःचे योगदान देऊ शकतील. या शहरांचे संचित आणि ओळख लक्षात घेऊन ती ठळकपणे समोर आणावी लागेल. फडणवीस हे सर्व प्रश्न लक्षात घेऊन त्यावर प्रचारात भर देत असल्याचे दिसले, जनतेने त्यांना त्याचमुळे कौल दिलेला दिसतो. ती जबाबदारी पूर्ण करण्याचे आव्हान अर्थातच आहे. गेल्या काही दिवसांमध्ये सत्तेत एकत्र असलेल्या तिन्ही पक्षांनी जेथे शक्य आहे आणि ताकद आजमावायची आहे, तेथे परस्परांविरुद्ध उभे राहण्याचा प्रयत्न केला. आपापसातच जागा वाटून घ्यायच्या, हा त्या प्रयत्नांचा उद्देश होता. त्यातही भाजप सरस ठरला. भाजपबरोबर असलेल्या एकनाथ शिंदे यांनी जेथे जेथे स्वबळावर निवडणूक लढवली, तेथे तेथे जनतेने भाजपला कौल दिला.अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे स्वाभिमानयज्ञ सुरू केला होता. त्या स्वाभिमान यात्रेला जनतेची पसंती नाही हे निकालांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात निदान नागरी भागात तरी शरद पवार ही शक्ती नाही. पवार कुटुंबाला फारसे स्थान नाही, हे देखील स्पष्ट झाले. पवार काका-पुतण्याला त्यांच्याच मैदानात मोठा पराभव पत्करावा लागला. विशेषतः पुण्यात झालेला नामुष्कीजनक पराभव पवारांच्या राजकारणाची भरकटलेली दिशा स्पष्ट करतो. राज्यातील अल्पसंख्याक जनता आधारासाठी काही पक्ष शोधते आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. मुस्लिम अस्मितेची जहाल भाषा बोलणाऱ्या एमआयएम या पक्षाला या निवडणुकीत मिळालेले यश लक्षवेधी आहे. कोणत्याही राज्याचा विकास हा अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक या खेळावर होत नसतो तर तो समन्वयाचा एक प्रतीकात्मक भाग असतो. तो लक्षात घेऊन त्यासाठी आखणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे नवनिर्माण करायचे असेल तर 52 टक्के जनतेला विश्वासात घेऊन त्यांना पुढे नेणारे काम करावे लागेल. त्यासाठी नव्या कारभाऱ्यांना शुभेच्छा. स्थानिक स्वराज्य संस्था भ—ष्टाचाराचे कुरण झाल्या आहेत. त्यामुळे यशाचा उन्माद न बाळगता कामाला लागण्याचे भान नव्या कारभाऱ्यांनी ठेवावे.*

# शहरात मतमोजणी बंदोबस्त निर्विघ्न पार

**विदर्भ केसरी। नागपूर,**

नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या निकालासाठी जवळपास चार हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आज शुक्रवारी सकाळी 10 वाजता शहरातील 10 झोनमध्ये मतमोजणीला सुरुवात झाली. सकाळीच सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मतमोजणी स्थळावर मोठी गर्दी केली होती. मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर कार्यकर्त्यांची गर्दी वाढायला लागली. त्यामुळे पोलिसांचा बंदोबस्ताचा भार वाढला. त्यामुळे पोलिसांना रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवावा



लागला. पोलिसांनी कार्यकर्त्यांना संयम ठेवण्याचे आवाहन केल्यानंतरही त्यांचा जोश कायम होता. त्यामुळे पोलिसांना दिवसभर बंदोबस्तात कायम तैनात राहावे लागले. मात्र, सायंकाळपर्यंत निकाल स्पष्ट झाल्यानंतर सर्व वातावरण जल्लोषमय झाले आणि आपापल्या प्रभागात विजयी उमेदवार निघून गेले. त्यामुळे पोलिस दलाकडून करण्यात आलेला बंदोबस्त अत्यंत सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

### वरिष्ठांची मतमोजणी स्थळाला भेट

**■ पोलिस आयुक्त सिंगल आणि सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी मतमोजणी केंद्रे, परिसरातील संवेदनशील व अतिसंवेदनशील भागात स्वतः भेटी दिल्या. तसेच वाहतूक व्यवस्थेवर काटेकोर लक्ष ठेवण्यात आले. सर्व ठिकाणी पुरेशा प्रमाणात पोलिस मनुष्यबळ तैनात करण्यात आल्याची पडताळणी केली.**

### जल्लोष आणि गुलाल

**■ दुपारी चार वाजताच्या सुमारास काही प्रभागातील निकाल स्पष्ट झाला. त्यामुळे कार्यकर्त्यांनी बँड, ढोल, तासे, संदल-डीजेसह जल्लोष करीत रस्त्यावर आनंदोत्सव साजरा करीत गुलाल उधळला. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था बिघडली होती. मात्र, पोलिसांनी रस्त्याच्या दोन्ही टोकांकडून वाहतूक बंद करीत योग्य नियोजन केले.**

# शक्तीवर्धक औषधे महागली!

**विदर्भ केसरी।नवी दिल्ली :**

चांदीमध्ये बॅक्टेरियाशी लढण्याची क्षमता असते. त्यामुळे याचा उपयोग गंभीर इन्फेक्शन, भाजलेल्या जखमांवरच्या क्रीममध्ये केला जातो. याशिवाय काही वैद्यकीय उपकरणांमध्येही याचा वापर होतो. सोने आणि चांदीचा आयुर्वेदिक आणि भस्म आधारित औषधांमध्ये सर्वाधिक वापर केला जातो. सोने-चांदीच्या दरात प्रचंड वाढ झाल्यामुळे आयुर्वेदिक औषधांच्या किमतीतही वेगाने वाढ झाली आहे. गेल्या एका वर्षात आयुर्वेदिक औषधांच्या किमती १० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ५० हून अधिक आयुर्वेदिक औषधांमध्ये सोने-चांदीचा वापर होतो. यात सर्दी-खोकला, मधुमेह, अशक्तपणा दूर करणे, श्वसन रोग, मूत्रमार्गाचे संक्रमण इत्यादी औषधे समाविष्ट आहेत. याशिवाय च्यवनप्राशमध्येही याचा वापर होतो. राजस्थानमध्ये आयुर्वेदिक औषधांचा वार्षिक १०० ते १५० कोटींचा व्यवसाय आहे. औषधांसाठी किमान १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची आवश्यकता असते. सध्या सोन्याची किंमत १ लाख ३० हजार रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागतील. पीएचडी स्कॉलर डॉ. शिवानी म्हणाल्या, आम्ही संशोधन करतो की, सोन्याचा वापर कोणत्या-कोणत्या रोगांच्या उपचारात करता येतो.

# मुंबईकरांनी विकासाला स्वीकारले, भावनिकतेला नाकारले:एकनाथ शिंदे

**विदर्भ केसरी।**

राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना–भाजप महायुती बहुमताच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, राज्यभरातील अनेक महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

ठाणे, कल्याण–डोंबिवली, संपूर्ण एमएमआर आणि मुंबईत महायुतीने जोरदार मुसंडी मारली असल्याचे त्यांनी सांगितले. ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाले असून, एमएमआर परिसरातही चांगल्या जागा मिळाल्या आहेत. मुंबईतही शिवसेना–भाजप महायुतीचा महापौर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बहुमताच्या अगदी जवळ पोहोचलो असून, राज्यात अनेक ठिकाणी महायुती सत्ता स्थापन करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान काही ठिकाणी भावनिक मुद्दे, भ्रष्टाचाराचे आरोप आणि विविध प्रकारचा प्रचार करण्यात आला. मात्र, मुंबईकरांनी आणि राज्यातील मतदारांनी भावनिकतेपेक्षा विकासालाच कौल दिला आहे. विकासविरोधी भूमिका घेणाऱ्यांना जनतेने नाकारले असून, विकास हाच ब्रँड जनतेने स्वीकारला असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने (उबाठा) १५० हून अधिक जागा लढवून सुमारे ६० जागा जिंकल्या, मात्र एकंदरीत जनतेने विकासाच्या अजेंडालाच पाठिंबा दिल्याचे त्यांनी नमूद केले.


केंद्रात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता अशा ट्रिपल इंजिन सरकारचा मुंबईला मोठा फायदा होणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना, त्या प्रवासात मुंबईचा मोठा वाटा असावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईला जागतिक दर्जाचे, जगाला हेवा वाटेल असे आंतरराष्ट्रीय शहर बनवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या साडेतीन वर्षांत मुंबईसाठी करण्यात आलेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत मुंबईतील सर्व प्रमुख रस्ते काँक्रीटचे करण्यात येणार असून, शहर खड्डेमुक्त झाल्याचे नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळेल. मुंबईत सात ठिकाणी सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) उभारले जात असून, यामुळे प्रदूषणमुक्त मुंबईकडे मोठे पाऊल टाकले जाईल. मेट्रो २, मेट्रो ३ आणि इतर मार्गांचे जाळे पूर्ण करण्यासाठी काम वेगात सुरू असून, पूर्वी रखडलेले प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यात आले आहेत.

बीकेसी आणि कुर्ला परिसरात नवीन 'अँड-फ्रेंड' ट्रान्सपोर्ट सिस्टीम उभारली जात असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत नवीन वाहतूक पर्याय म्हणून पॉड टॅक्सीचा प्रयोग सुरू करण्यात आला असून, ठाणे–साकेत–गायमुख–फॉन्ट्रान मार्गामुळे ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

# आरडीच्या नावे पावणे चार लाखांनी दाम्पत्याची फसवणूक

**विदर्भ केसरी।वर्धा,**




आर. डी.च्या नावाने दाम्पत्याची तब्बल पावणे चार लाखांनी Fraud फसवणूक करण्यात आली. ही घटना वैशालीनगर येथे उघडकीस आली. मनोहर मेंढे (५३) रा. वैशालीनगर यांनी चरणदास खैरकार रा. रामनगर याच्याकडे फेब्रुवारी २०२० ते जानेवारी २०२५ पर्यंत पोस्टाची दरमहा ५ हजार रुपये आणि ज्योती खैरकार हिच्याकडे पत्नीच्या नावाने दरमहा २ हजार रुपयांची, अशा दोन वेगवेगळ्या आरडी काढल्या होत्या. हे दोघेही पैसे घेण्याकरिता मेंढे यांच्या घरी येत होते.

आतापर्यंत त्यांनी ५४ हप्त्यांचे पैसे धनादेशाने व सहा हप्त्यांचे पैसे रोख चरणदास खैरकार याच्याकडे दिले होते. आर. डी. जानेवारी महिन्यात पूर्ण झाल्याने त्यांनी पासबुक परत मागितले. परंतु, चरणदासने पासबुक देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन चौकशी केली असता आरडीच्या दिलेल्या ६० हप्त्यांपैकी केवळ ६ हप्ते भरल्याचे दिसून आले. त्यांची तब्बल ३ लाख ७८ हजार रुपयांनी Fraud फसवणूक केली.



# राज्यात महानगर पालिकांवर कमळ

**विदर्भ केसरी। वर्धा,**

राज्यात झालेल्या महानगर पालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने यश मिळविले. त्यानिमित्त पक्ष कार्यालयात गुलाल उधळून मिठाई वाटप करण्यात आले. वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, आ. राजेश बकाने, आ. सुमित वानखेडे, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे आदींकडे विदर्भातील महानगर पालिकांमध्ये प्रचाराची जबाबदारी देण्यात आली होती.

राज्यातील महानगर पालिकांवर भाजपाचे कमळ फुलताच पक्ष आदेशाने वर्धेत गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष संजय गाते, नवनियुत नप उपाध्यक्ष प्रदीप ठाकूर, माजी नप अध्यक्ष अतुल तराळे, भाजपाचे माजी अध्यक्ष सुनील गफाट, नवनिर्वाचित नप सदस्य निलेश पोहेकर, नौशाद शेख, पृथ्वीराज शिंदे, भाजपाचे गट नेता विलास आगे आदींसह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मांजाचा वापर करणाऱ्या ११ जणांवर पोलिसांची कारवाई

**विदर्भ केसरी। पुसद,**

पतंग उडवण्यासाठी शहरात Nylon Manja नायलॉन मांजाचा वापर केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. मांजाचा वापर करणाऱ्या जणांवर शहर पोलिसांनी त्वरित कारवाई करून गुन्हे दाखल केले आहेत.

रोहिदास पुंजाजी भारस्कर (सुभाष वार्ड), गोपाल परसराम पोराजवार (गणेश वार्ड), संतोष नारायण पोराजवार (सुभाष वार्ड), मनोज महावीर चौधरी (आंबेडकर वार्ड), कैलास ओंकार जोशी (सुभाष वार्ड), सुरेश चंद्रभान खरात (सुभाष वार्ड), स्वप्निल सुभाष चव्हाण, हिरामण बबन राठोड (पूस नदीच्या बांधाजवळ), विजय व्यवहारे (सुभाष वार्ड), संतोष तानाजी मुखरे (गणेश वार्ड) व विशाल अशोक हंस (वाशिम रोड पुसद) या ११ जणांविरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहर पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, गुन्हे दाखल झालेल्या ११ जणांनी Nylon Manja अवैध मांजाचा वापर करून कायद्याचे उल्लंघन केले आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दाखल झाल्याने शहरात सर्वत्र खळबळ उडाली आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकातील उमेश राठोड, अभिजित सांगळे, गजानन चव्हाण, नीलेश आडे, संतोष सरकुंडे, सुनील चिरमाडे, मुरलीधर पांडुळे, गजानन जाधव यांनी केली. नागरिकांनी मांजाचा वापर करू नये, असे आवाहन करण्यात आला असून नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्याची माहिती दिल्यास व त्याचे सांगणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी सांगितले आहे.



दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## अवैध रेती तस्करीवर कारवाई

■ आर्णी पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध रेती तस्करीवर महसूल विभागाने मोठी कारवाई केली आहे. मंडळ अधिकारी अजय अंबादासराव सुरोशे यांना मिळालेल्या माहितीनुसार, १४ जानेवारी रोजी दुपारी एक विना क्रमांकाचा ट्रॅक्टर १ ब्रास रेतीची विनापरवाना चोरी करून वाहतूक करताना आढळला. महसूल पथकाने हा ट्रॅक्टर पकडून पोलिसांच्या स्वाधीन केला. पोलिसांनी ८,००० रुपयांची रेती आणि ५ लाख रुपयांचा ट्रॅक्टर असा एकूण ५,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## संक्षिप्त...

### भरदिवसा घरफोडी, एलइडी टीव्ही लंपास

▸विदर्भ केसरी।

यवतमाळमधील अवधूतवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत घरफोडीची एक घटना उघडकीस आली आहे. समनानी नगर येथील रहिवासी रमेश शामराव पाटील (६६) यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील २३,९९९ रुपये किमतीचा 'VU Premium' कंपनीचा ४३ इंची फुल एचडी एलइडी टीव्ही चोरून नेला. ही घटना ७ ऑक्टोबर २०२५ च्या दरम्यान घडली होती, ज्याची तक्रार १५ जानेवारी रोजी दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ) आणि ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा नोंदवला असून अधिक तपास सुरू आहे.

### बोलेरो पिकअपच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील कोळंबी शिवारात एका भीषण रस्ते अपघातात एका तरुणाचा बळी गेला आहे. फिर्यादी सतीश भारत गिरी यांचा भाऊ गणेश भारत गिरी हा १४ जानेवारी रोजी सायंकाळी रस्त्याच्या कडेला उभा असताना एका भरधाव बोलेरो पिकअप वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात गणेश गंभीर जखमी झाला आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर पिकअप चालक वाहन सोडून पसार झाला. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील शोध घेतला जात आहे.

### ई-रिक्षाची बॅटरी चोरीला

▸विदर्भ केसरी।

शहरातील शिव नगर परिसरातून एका ई-रिक्षाची बॅटरी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी दिलीप विठ्ठलराव सावरे (६२) यांनी आपली ई-रिक्षा (क्र. MH 29 BE 4744) घरासमोर उभी केली होती. १४ जानेवारीच्या रात्री अज्ञात चोरट्याने रिक्षाची १४,००० रुपये किमतीची 'एक्साईड' कंपनीची बॅटरी चोरून नेली. सकाळी ही बाब लक्षात आल्यानंतर सावरे यांनी यवतमाळ शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांमुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### पाणी उपसा पंप चोरी

▸विदर्भ केसरी।

लोहारा पोलीस स्टेशन अंतर्गत निमखेड शिवारात एका शेतकऱ्याचा शेती पंप चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. फिर्यादी अजय शालिकराम चव्हाण (३८, रा. तिरुपती नगर) यांच्या शेतातील विहिरीवर बसवलेला १०,००० रुपये किमतीचा इलेक्ट्रिक वॉटर मोटर पंप अज्ञात चोरट्याने १३ जानेवारीच्या रात्री चोरून नेला. विहिरीवर पाणी देण्यास गेलेल्या फिर्यादीला पंप गायब असल्याचे दिसले. याप्रकरणी लोहारा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. रब्बी हंगामात सिंचनाची गरज असतानाच पंप चोरीला गेल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### शेळ्या चारण्याच्या किरकोळ वादातून वृद्धाला काठीने मारहाण

▸विदर्भ केसरी। कळंब

तालुक्यातील कोठा येथे शेळ्या चारण्याच्या वादातून एका वृद्धाला बेदम मारहाण करण्यात आली. फिर्यादी सौ. छाया संतोष वानखेडे यांचे पती संतोष वानखेडे हे शेळ्या चारत असताना आरोपी देविदास आत्माराम धोटे याने जुन्या वादाचा राग धरून त्यांना अडवले. आरोपीने त्यांना शिवीगाळ करत हातातील लाकडी काठीने आणि दगडाने बेदम मारहाण केली, ज्यामध्ये ते जखमी झाले. ही घटना १४ जानेवारी रोजी दुपारी घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून कळंब पोलिसांनी आरोपी देविदास धोटेविरुद्ध मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### ४५ हजारांचे सोयाबीन लंपास

▸विदर्भ केसरी। नेर

तालुक्यातील माळेगाव येथे एका शेतकऱ्याच्या गोदामातून सोयाबीनची मोठी चोरी झाली आहे. फिर्यादी अशोक देवराव शिंदे (३८) यांनी आपल्या गोदामात विक्रीसाठी सोयाबीन साठवून ठेवले होते. १२ ते १३ जानेवारीच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने गोदामाचे कुलूप तोडून १० ते १२ क्विंटल सोयाबीन चोरून नेले. चोरीला गेलेल्या सोयाबीनची अंदाजे किंमत ४५,००० रुपये आहे. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नेर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस आता परिसरातील संशयीतांची आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांची चौकशी करत आहेत.

# अनुष्का दीदीला न्याय मिळालाच पाहिजे!

## लातूर नवोदय विद्यालय प्रकरण : अनुष्का पाटोळेच्या संशयित मृत्यूवर SIT चौकशीची मागणी तीव्र



▸विदर्भ केसरी। यवतमाळ

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालय क्र. १२ मधील इयत्ता ६वीची विद्यार्थिनी कु. अनुष्का किरण पाटोले हिच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सुरुवातीला हा मृत्यू आत्महत्या म्हणून नोंदवला गेला, मात्र कुटुंबीयांनी हा प्रकार हत्या असल्याचा ठाम आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील सामाजिक संघटना, विद्यार्थी वर्ग आणि मातंग समाजामध्ये तीव्र संताप उसळला असून अनेक ठिकाणी आंदोलनाची तयारी सुरू आहे.

सकल मातंग समाज, यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की— अनुष्काचा मृत्यू हा साधा अपघात नसून विद्यालय प्रशासनातील गंभीर निष्काळजीपणा, गैरव्यवहार आणि अमानवीय वर्तनाचे दुष्परिणाम आहेत.

प्रकरणात विद्यालयातील दोन महिला कर्मचाऱ्यांवर IPC कलम 108, 115(2), 305 तसेच SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

नवोदय विद्यालयाविरुद्ध यापूर्वीही अनेक तक्रारी होत्या, पण कधीही योग्य चौकशी झाली नाही. त्यामुळे या प्रकरणाची स्वतंत्र SIT मार्फत निष्पक्ष, पारदर्शक आणि कडक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देताना एक हृदयस्पर्शी क्षण पाहायला मिळाला. इयत्ता शिकत असलेल्या गार्गी विवेक वानखेडे आणि अनघा विशाल धनस्कर या दोन चिमुकल्या मुलींनी ठामपणे म्हणत आवाज दिला—

"अनुष्का दीदीला न्याय मिळालाच पाहिजे!" या निरागस मागणीमुळे उपस्थित अधिकारी आणि मान्यवर काही क्षण स्तब्ध झाले. विविध संघटनांची चेतावणी — "न्याय न मिळाल्यास राज्यव्यापी आंदोलन!"

मनोज रणखाम, राजाभाऊ इंगोले, विवेक वानखडे, अरविंद वानखडे, प्रा. यशवंत खंडारे, प्रा. संजय नाटकर, सागर कळणे, सतीश सकट, देविदास महाले, विशाल तेलंग, दिनेश वाघमारे, मेजर सचिन खंडारे, चंदन हातागळे, संतोष कांबळे, सागर झोंबाडे, महादेव थोरात, अजय यंगड, पंडित वानखेडे, विकी नाडे, सचिन शेळके, दीपक यंगड आदींची उपस्थित होते.

■ निवेदन कार्यक्रमात खालील संघटना सहभागी झाल्या—

■ लहुजी शक्ती सेन विदर्भ मातंग समाज संघटना, मांग-गारोडी समाज संघटना, साहित्य व कला अकादमी, अण्णाभाऊ साठे स्मारक समिती

■ या सर्व संघटनांनी सरकारला इशारा दिला— "अनुष्काला न्याय न मिळाल्यास महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन उभे करू!"

### सकल मातंग समाजाच्या प्रमुख मागण्या

■ 1. स्वतंत्र SIT मार्फत जलद, निष्पक्ष चौकशी.
2. पीडित कुटुंबास आर्थिक मदत, सुरक्षा व पुनर्वसन.
3. विद्यालयातील कर्मचारी-अधिकाऱ्यांची पूर्ण तपासणी.
4. भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी प्रशासनिक सुधारणा.
5. चौकशीवर कोणताही राजकीय वा प्रशासकीय हस्तक्षेप नको.

■ प्रा. संजय वानखडे यांची संतप्त प्रतिक्रिया

■ प्रा. वानखडे म्हणाले— "आपण भविष्याची एक अधिकारी गमावली! मातंग समाज शांत आहे, पण अशा घटना असह्य आहेत. न्याय न मिळाल्यास आम्ही उग्र आंदोलन करू."

एकच आवाज — न्याय!

लहान मुलींपासून ते विविध संघटनांपर्यंत सर्वांच्या मनात एकच भावना—"अनुष्का पाटोलेला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही!"

राज्यभर वाढत असलेल्या रोषाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनावर SIT चौकशीसाठीचा दबाव वाढत असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी अधिक तीव्र होत आहे.

## वीर बापू बिरू वाटेगावकर सेवाभावी संस्थेतर्फे भव्य मोफत वैद्यकीय शिबिर

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

वीर बापू बिरू वाटेगावकर सेवाभावी संस्था (शाखा यवतमाळ) व यवतमाळ येथील अगस्त्य हॉस्पिटल, धामणगाव रोड यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बाबू वाटेगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य मोफत वैद्यकीय रोगनिदान व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले असून, शिबिराचे स्थळ डॉ. आदित्य अढाऊकर यांचे "अक्षय आरोग्यम" मल्टीस्पेशालिटी क्लिनिक व पंचकर्म सेंटर, गायत्री नगर, रचना अपार्टमेंट, दुकान क्र. ५, वाघापूर–लोहारा बायपास, लोहारा, यवतमाळ असे आहे. या मोफत वैद्यकीय शिबिरामध्ये यवतमाळ येथील नामांकित व अनुभवी तज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांवर तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. शिबिरामध्ये खालील तज्ञ डॉक्टर आपली सेवा देणार आहेत—अस्थिरोग तज्ञः डॉ. अनिकेत खरात स्त्रीरोग व प्रसूती तज्ञः डॉ. हर्षलता गायनर नेत्ररोगवरेटिनातज्ञः डॉ.श्वेतावानखेडे दंत व मुखरोग तज्ञः डॉ. उल्का शिंदे खरात जनरल फिजिशियन व बालरोग तज्ञः डॉ. आदित्य अढाऊकर फिजिओथेरपी तज्ञः डॉ. प्रफुल साऊळकर या शिबिराचे उद्घाटन मा. प्रदीप झाडे, संस्थापक अध्यक्ष, नेर अर्बन बँक लि., यवतमाळ जिल्हा यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. बाळकृष्ण गाढवे, केंद्रीय अध्यक्ष, विदर्भ पटवारी संघ व अध्यक्ष, पटवारी कर्मचारी सहकारी पतसंस्था, यवतमाळ राहणार आहेत.प्रमुख अतिथी म्हणून मा. ज्ञानोबा देवकते, पोलीस अधीक्षक (वाहतूक शाखा), यवतमाळ यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. योगेश देशमुख (तहसीलदार, यवतमाळ), मा. सुनील नाईक (ठाणेदार, ग्रामीण पोलीस स्टेशन, यवतमाळ), मा. रोहित चौधरी (ठाणेदार, लोहारा पोलीस स्टेशन), मा. प्रमोद मेटांगे (संस्थापक अध्यक्ष, वीर बापू वाटेगावकर), मा. सचिन ढगे (संपादक, साप्ताहिक विदर्भ रक्षक व संस्था मार्गदर्शक), ह.भ.प. मुकेश महाराज चुडे तसेच प्रा. पंढरी दत्तराव पाठे (शेतकरी चळवळ, यवतमाळ जिल्हा) उपस्थित राहणार आहेत.या मोफत वैद्यकीय शिबिराचा लाभ वाघापूर, लोहारा व यवतमाळ परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन वीर बापू बिरू वाटेगावकर सेवाभावी संस्था यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## पिण्याच्या पाण्याच्या कारणावरून एकाला मारहाण



▸विदर्भ केसरी। दारव्हा

तालुक्यातील बगी येथे पिण्याच्या पाण्याच्या वादातून एका व्यक्तीला मारहाण करण्यात आली. फिर्यादी रामकृष्ण बळीराम गोरे (५५) हे सार्वजनिक नळावर पाणी भरत असताना आरोपी संजय राठोड आणि त्याच्या तीन साथीदारांनी त्यांना जुन्या वादावरून अडवले. आरोपींनी "तू आमच्या नादाला लागू नको" असे म्हणत फिर्यादीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना १४ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली. दारव्हा पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपी संजय राठोड व इतर तीन जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून तपास सुरू आहे.

## चिंतामणी नगरीत आढळले पुरातन शिवलिंग, नंदी !

▸विदर्भ केसरी। कळंब



कळंबः यवतमाळ जिल्ह्यातील विदर्भाचे आराध्य दैवत भगवान चिंतामणी कळंब नगरीतील सारडे ले आउटच्या ओपन प्लेस मध्ये ज्येष्ठ नागरिक भवन उभारणीचे काम सुरू आहेः खोदकाम सुरू असताना अचानक 15 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजताच्या दरम्यान अचानक पुरातन काळातील शिवपिंड नंदी व शिवलिंग आढळून आले संपूर्ण शहरात याची चर्चा झाली असून घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली.आज ११ वाजता शिरभाते ले आऊट परिसरात नगरपालिकेच्या जेष्ठ नागरिक भवनच्या खोदकामादरम्यान प्राचीन काळातील शिव पिंड, नंदी आणि शिवलिंग सापडले आहेत. कळंब हे गाव प्राचीन काळापासून धार्मिक, सांस्कृतिक आणि रणनीतिक महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. इतिहासात या भागात किल्ले, मंदिरे आणि प्राचीन वसाहती होत्या, ज्यामुळे येथील लोकसंपन्नतेचा आणि राजकीय सामर्थ्याचा अंदाज मिळतो.गावातील प्रसिद्ध श्री चिंतामणी मंदिर हे धार्मिक दृष्ट्या प्रसिद्ध आहेत. तसेच चौदा चावड्या 32 महालाचे गाव अशी आख्यायिका असून आजही गावाच्या सभोवताल 12 मारुती मंदिर या ठिकाणी आढळून येतात प्राचीन वास्तू, पुरातन वस्तू आणि मंदिरांचे अवशेष सापडल्यामुळे कळंबचा ऐतिहासिक वारसा उजळून दिसतो. स्थानिक नागरिक या ऐतिहासिक शोधामुळे उत्साहित आहेत आणि भविष्यात या जागेचा सुरक्षित व सांस्कृतिक उपयोग होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मात्र नागरिकांनी घटनास्थळी दिवसभर मुर्त्यांची पूजा अर्चना करीत गर्दी केली घटनास्थळी कळंबचे तहसीलदार धीरज स्थूल यांनी भेट दिली असून वरिष्ठांना घटनेची माहिती दिल्याचे कळविले

## विद्यार्थ्यांनो जीवनातील आव्हाने हसत खेळत स्वीकारा ! : डॉक्टर दिलीप अलोने

▸विदर्भ केसरी। वणी : प्रतिनिधी




आयुष्याला सामोरे जात असताना अनेक संकटे आले तरी आपले जीवनातील आव्हाने हसत खेळ स्वीकारा आणि यशापशयाचा आनंद लुटा. अपेक्षा विरहित आयुष्य जगले तर आनंदच वाट्याला येईल. कारण प्रमाणापेक्षा जास्त अपेक्षा हेच दुःखाचे मूळ कारण आहे असे मत लोक कलावंत डॉक्टर दिलीप अलोने यांनी व्यक्त केले. तणाव मुक्त विद्यार्थी अभियाना अंतर्गत येथील आदर्श विद्यालय आयोजित "नो टेन्शन अटेंशन" या कार्यक्रमात दिलीप अलोने सर विद्यार्थ्यांना प्रेरित करीत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक रघुनाथ मोहिते सर, पर्यवेक्षक पीदूरकर सर तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त बाळासाहेब खैरे हे उपस्थित होते. आपल्या उगवत्या आणि नाट्य शैलीत अनेक रंजक किस्से सांगत डॉक्टर आलोने यांनी विद्यार्थ्यांना हसत खेळत मार्गदर्शन केले. पुढे त्यांनी असेही सांगितले की, आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांनो आपल्या जीवनात येणारे क्षण मनमुरात परंतु निर्विकार आनंद लुटा असा मोलाचा सल्ला दिला. यावेळी बाळासाहेब खैरे यांनी "मी कसा घडलो ! तुम्ही बी घडाना" असे सांगून त्यांनी आपण आदर्श विद्यालय येथे शिकलो असल्याचे सांगून त्यावेळेसचे जीवन कसे होते. आपणास कोणत्या सरांनी शिकवले. आपण कुठे बसत होतो अशा जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरू नये. मोबाईल वापराचा त्याग करून मोबाईल ऐवजी पुस्तक हातात ठेवले पाहिजे असा मोलाचा संदेशही दिला. त्यानंतर मुख्याध्यापक रघुनाथ मोहिते यांनी डॉक्टर अलोने यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. बैजनाथ खडसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत आभार प्रदर्शन केले यावेळी विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## पँथर नामदेव ढसाळ यांना अभिवादन

▸विदर्भ केसरी। यवतमाळ



क्रांतिकारी कवी,दलित पँथर चळवळीचे संस्थापक पँथर नामदेव ढसाळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज दिनांक १५ जानेवारी (गुरुवार) रोजी सायंकाळी ठीक ५.०० वाजता यवतमाळ शहरातील संविधान चौक,येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी पँथर नामदेव ढसाळ यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून कॉम्रेड नामदेव ढसाळ यांच्या क्रांतिकारी विचारांना अभिवादन केले.उपस्थित वक्त्यांनी आपल्या मनोगतातून नामदेव ढसाळ यांचे साहित्यिक व सामाजिक योगदान,दलित पँथर चळवळीची ऐतिहासिक भूमिका तसेच अन्याय-अत्याचाराविरोधातील त्यांचा लढा यावर प्रकाश टाकला. या अभिवादन कार्यक्रमास त्या काळातील नामदेव ढसाळ यांचे सहकारी कार्यकर्ते गुलाबराव सोळंकी,ॲड.जयसिंग चव्हाण,यशवंत आंबुलकर,सुनील भेले,काशिनाथ गजभिये,कृतिका कुलसंगे,बादल मेश्राम,सोशल मीडिया काँग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर,शेतकरी चळवळीचे कॉम्रेड सचिन मनवर,शुभम तेलगोटे,शुभम दिवाने,आदित्य बोरेकर,दीक्षांत भगत,प्रा.पंढरी पाठे,यांच्यासह शहरातील विविध पँथर कार्यकर्ते,आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व पँथर प्रेमी उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी कॉम्रेड नामदेव ढसाळ यांचे विचार जिवंत ठेवण्याचा आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## यवतमाळ जिल्हा प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न : नायब तहसीलदार पाईकराव यांच्या हस्ते प्रकाशन; मुख्य संपादक अमोल कंटाळे यांचे मार्गदर्शन

# 'विदर्भ केसरी' दिनदर्शिकेचे उमरखेडमध्ये थाटात विमोचन

▸विदर्भ केसरी। उमरखेड

**दैनिक विदर्भ केसरीची दिनदर्शिका २०२६ उमरखेड येथील अनिरुद्ध हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात जिल्ह्यात विमोचन करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यानिमित्त यवतमाळ जिल्ह्यातील तालुका प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठकही पार पडली. कार्यक्रमास पत्रकार, मान्यवर व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**





दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक नायब तहसीलदार पाईकराव साहेब होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक विदर्भ केसरीचे मुख्य संपादक अमोल कंटाळे साहेब विराजमान होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नंदू कांबळे, रहेमात खान, संभाजी कांबळे, शाहरुख पठाण यांची उपस्थिती लाभली. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील दैनिक विदर्भ केसरीचे सर्व तालुका प्रतिनिधी आवर्जून उपस्थित होते.

प्रमुख उद्घाटक नायब तहसीलदार पाईकराव साहेब यांनी आपल्या मनोगतात दैनिक विदर्भ केसरीच्या सामाजिक बांधिलकीच्या पत्रकारितेचे कौतुक करत दिनदर्शिकेस व वृत्तपत्राच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय मनोगतात मुख्य संपादक अमोल कंटाळे साहेब यांनी यवतमाळ जिल्ह्यातील प्रतिनिधींना पत्रकारितेतील मूल्ये, जबाबदारी, अचूकता व निर्भीडपणा याबाबत मार्गदर्शन केले. यानंतर पार पडलेल्या यवतमाळ जिल्हा प्रतिनिधींच्या बैठकीत वर्तमानपत्राचे नियोजन, बातम्यांची गुणवत्ता, जिल्हास्तरीय समन्वय, वाचकसंख्या वाढविण्याचे उपाय, ग्रामीण व शेतकरी प्रश्नांना प्राधान्य, तसेच डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर यासह विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बदलत्या पत्रकारितेच्या काळात वाचकांच्या अपेक्षा कशा पूर्ण करता येतील, यावर प्रतिनिधींनी आपली मते मांडली. बैठकीत नियोजनबद्ध कामकाज, वेळेचे काटेकोर पालन आणि विश्वासार्ह बातमी सादरीकरण यावर विशेष भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. या चर्चेमुळे जिल्ह्यातील प्रतिनिधींमध्ये एकसंधता व नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकाटे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन तालुका प्रतिनिधी प्रवेश कवडे यांनी केले. दिनदर्शिका प्रकाशन व प्रतिनिधी बैठक यशस्वीरीत्या पार पडत दैनिक विदर्भ केसरीच्या पत्रकारितेतील वाटचालीला नवे बळ मिळाले, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. बैठकीला जिल्ह्यातील विविध तालुक्यातील तालुका प्रतिनिधी उपस्थित होते

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
शनिवार, १७ जानेवारी २०२६ | ४



## २० महिन्यांत ८५१ वृक्षांची कत्तल



वर्धा, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे' असे संत तुकाराम महाराजांनी वृक्षांचे आणि पर्यायाने निर्सगाचे महत्त्व अधोरेखित केले. पण, सध्या विकासाच्या नावाखाली तसेच घराच्या आवारात पानांचा कचरा होत असल्याचे कारण पुढे करीत डेरेदार वृक्ष तोडण्याचा सपाटा लावल्या जात आहे. एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या २० महिन्यांच्या काळात जिल्ह्यात felling of trees तब्बल ८५१ वृक्षांची विना परवागी कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. यातील १२० प्रकरणांत ३ लाख ७४ हजारांचा दंड वसुल करण्यात आला.

**संक्षिप्त...**

## भाजपला नाकारले, स्पष्ट बहमत कुणालाच नाही

**विदर्भ केसरी। अमरावती :**

अमरावती महापालिकेच्या मतदानानंतर शुक्रवारी 16 जानेवारी रोजी



नवसारी येथील क्रीडा संकुलात 22 प्रभागातील 87 जागांची मतमोजणी करण्यात आली. त्यापैकी 71 जागांचे निकाल हाती आली आहेत. त्यामध्ये 23 जागा जिंकून भाजप पहिल्या स्थानी आहे. मात्र मागील निवडणुकीतील भाजपच्या 45 जागांवरचा विजय पाहता भाजप 25 चा आकडा पार करणार किंवा नाही यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. भाजप खालोखाल काँग्रेस 15, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट 13, युवा स्वाभिमान पक्ष 4, एम आय एम 9, बहुजन समाज पक्ष 3, शिवसेना शिंदे गट 3, शिवसेना ठाकरे गट 1, वंचित एका जागेवर विजयी आहे. अमरावती महापालिकेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा देखील पराभव झाला आहे. यासह साईनगर प्रभागात मुख्यमंत्र्यांच्या जवळचे समजले जाणारे आमदार श्रीकांत भारतीय यांचे बंधू तुषार भारतीय हे देखील पराभूत झाले आहे. साईनगरातील लढत सर्वात महत्त्वपूर्ण मानली जात होती. कारण येथे युवा स्वाभिमान कडून सचिन भेंडे यांना उमेदवारी देण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांच्या पराभवात तुषार भारतीय यांचा मोठा वाटा असल्याचे मानले जात होते. त्यामुळे आपल्याला पराभूत करणाऱ्यांचा महापालिका निवडणुकीत पराभव करणार, असा जाहीर इशारा नवनीत राणा यांनी दिला होता. अपेक्षेप्रमाणे युवा स्वाभिमानचा उमेदवार चार हजारांच्या मताधिक्याने निवडून आला आहे. 2017 च्या महापालिका निवडणुकीत भाजपला 87 पैकी 45 जागांवर विजय मिळाला होता. त्या जागा कायम ठेवणे भाजपला 2026 मध्ये जमले नाही. याला कारण म्हणजे भाजपने ही निवडणूक कार्यकर्त्यांना गृहीत धरून हिंदुत्वाच्या मुद्द्यावर लढविण्याचा प्रयत्न केला. चक्क भाजपच्या निरीक्षकांनी देव, देश आणि धर्म याचा प्रचार सुरू केला होता. त्यातही तिकीट वाटपात जमिनीवरच्या कार्यकर्त्यांवर अन्याय झाला. काँग्रेस सारख्या पक्षातील उमेदवारही आयात करण्यात आले. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्याला भाजपमधील हा अन्याय सहन झाला नाही.

## जनतेनेच बदला घेतला; विजय वडेट्टीवार

**विदर्भ केसरी। चंद्रपूर**

: चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस व मित्रपक्षांना



मिळालेल्या यशावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपने चंद्रपूर शहराचा बट्ट्याबोळ केल्याचा आरोप करत, त्याचा बदला जनतेने मतपेटीतून घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनतेने काँग्रेस आणि मित्रपक्षांवर विश्वास ठेवून आशीर्वाद दिल्याबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया देताना भाजपच्या शहरातील कारभारावर तीव्र शब्दांत टीका केली. "भाजपने चंद्रपूर शहराचा बट्ट्याबोळ केला. त्याचा बदला जनतेने या निवडणुकीत घेतला आहे. महाविकास आघाडीला जनतेने पाठिंबा दिला असला, तरी विशेषतः काँग्रेस आणि मित्रपक्षांना जनतेने आशीर्वाद दिले आहेत," असे वडेट्टीवार म्हणाले. मतदारांनी काँग्रेसवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. "या शहरात आपण विश्वास ठेवला, त्या विश्वासाला जनतेने मतांच्या माध्यमातून बळ दिले," असेही त्यांनी नमूद केले. आघाडीच्या संख्याबळावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, "आमची नैसर्गिक आघाडी पप्पू देशमुख यांच्यासोबत होती. त्यांच्यासह तीन नगरसेवक निवडून आले आहेत. याशिवाय पक्षाने तिकीट न दिल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेले दोन नगरसेवकही आमच्याच सोबत आहेत. सध्या आमच्याकडे ३२ नगरसेवक आहेत." ते पुढे म्हणाले, "उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ नगरसेवक आहेत. इतर काही नगरसेवकही आमच्या संपर्कात आहेत. त्यामुळे एकूण आकडा ४० ते ४२ पर्यंत जाईल. आम्हाला स्पष्ट बहुमत मिळेल आणि सत्तास्थापनेत कोणतीही अडचण येणार नाही," असा विश्वास वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. राज्यातील काँग्रेसच्या स्थितीवर भाष्य करताना वडेट्टीवार म्हणाले, राज्यात आमचे १६ आमदार असले, तरी चंद्रपूर, लातूर, भिवंडी, अमरावती आणि अकोला येथे आम्हाला चांगले यश मिळाले आहे. सत्ता, सरकारी यंत्रणा, पैसा आणि मतदारयादीतील घोळ याविरोधात आम्ही ही निवडणूक लढवली. या सगळ्या गोष्टींच्या विरोधात जनतेने स्पष्ट कौल दिला आहे. जनतेने काँग्रेसला पाठिंबा दिला असून, पुढील वाटचालीसाठी आम्हाला मोठे बळ मिळाले आहे," असे सांगत विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसच्या यशाचा विश्वास व्यक्त केला.

# कापूस ८ हजारांवर, मात्र ढेप ४ हजारांच्या पार

### दुध उत्पादक शेतकरी 'ढेपी'च्या महागाईने हैराण! पशूपालनाचा खर्च आवाक्याबाहेर. : दुधाच्या दरात वाढ नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात.



**विदर्भ केसरी। प्रा एल डी सरोदे.**

सध्या ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुग्धव्यवसाय मोठ्या संकटातून जात आहे. एकीकडे कापसाचे भाव प्रति क्विंटल ८ हजार रुपयांच्या आसपास स्थिरावलेले असताना, दुसरीकडे सरकी ढेपीचे दर मात्र ४ हजार रुपयांच्या वर पोहोचले आहेत. कापसापासून रुई, सरकी आणि तेल असे मौल्यवान घटक वेगळे निघत असतानाही, प्रक्रियेनंतर उरणाऱ्या ढेपीचे दर एवढे गगनाला का भिडले आहेत? असा संतप्त सवाल आता दूध उत्पादक शेतकरी विचारत आहेत. महागड्या ढेपीमुळे गणिते कोलमडली दुभत्या जनावरांना, विशेषतः गाई आणि म्हशींना दुधवाढीसाठी आणि त्यांच्या आरोग्यासाठी नियमितपणे सरकी ढेप द्यावी लागते. मात्र, गेल्या काही महिन्यांत ढेपीच्या दरात झालेली प्रचंड वाढ पशूपालकांचे कंबरडे मोडणारी ठरत आहे. ४ हजार रुपये क्विंटल दराने ढेप विकत घेऊन जनावरांना घालणे आणि त्यातून मिळणाऱ्या दुधाला अपेक्षित दर न मिळणे, यामुळे हा व्यवसाय आता तोट्याचा ठरू लागला आहे. कापूस स्वस्त, उपपदार्थ महाग? शेतकऱ्यांच्या मते, कापसावर प्रक्रिया केल्यानंतर त्यातून रुई निघते, जी कापड उद्योगात वापरली जाते. सरकीतून महागडे खाद्यतेल काढले जाते. हे सर्व मुख्य उत्पादनं निघाल्यानंतर उरलेला चोथा म्हणजे 'ढेप' असते. तरीही ढेपीचे दर कापसाच्या एकूण भावाच्या निम्म्यापर्यंत पोहोचल्याने यात व्यापाऱ्यांची नफेखोरी आहे की काय, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

> **गायीला ढेप घातल्याशिवाय दूध उतरत नाही, आणि ढेप आणायला खिशात पैसे नाहीत. कापूस विकला तरी घरखर्च भागत नाही, त्यात ढेपीचे दर ऐकून धडकी भरते. पशूपालन आता न परवडणारा धंदा झाला आहे."**
> **- प्रथमेश निरंजन गवई मूर्तिजापूर., पशूपालक.**

> **पशूखाद्याच्या (ढेप) वाढत्या दरावर शासनाने नियंत्रण मिळवावे. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर दर मिळावा. सरकी ढेपीच्या साठेबाजीची चौकशी व्हावी अशी मागणी शेतकरी व दुध उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.**

> **कापूस पिकवून आम्हाला ८ हजार रुपये मिळतात, पण त्याच कापसाची ढेप घ्यायला गेलो तर ४ हजार मोजावे लागतात. मग आम्ही खायचे काय आणि जनावरांना काय घालायचे? दुधाचे भाव वाढायला तयार नाहीत, पण पशूखाद्याचे दर दररोज वाढत आहेत. सरकारने यावर नियंत्रण आणायला हवे."**
> **-रमेशराव अवघड. लाखपूरी, प्रगतशील शेतकरी.**

> **महिनाभर ढेप आणि चारा पाणी करून जेवढे दूध मिळते, त्यातून ढेपीचा खर्चही निघत नाही. सरकीतून तेल काढून घेतल्यावर उरलेला माल एवढा महाग कसा असू शकतो? ही सरळ सरळ लूट आहे. अशाने सामान्य दूध उत्पादक शेतकरी पूर्णपणे गारद होईल."**
> **-दामोदर गावंडे.हेंडज, दूध उत्पादक.**

# आता झेड पी/ पं स निवडणुकीचा मज्जाव

### लोकशाहीची थट्टा नव्हे; थेट लिलाव : "लीडर" नव्हे "डीलर" निवडून आलेले देणारी प्रक्रिया

**विदर्भ केसरी। संतोष काळे :-**



**वाशीम** नुकत्याच नगर परिषद, महानगर पालिकेच्या निवडणूका पाहिल्या. त्यात झालेले मोठमोठे आर्थिक व्यवहार पाहिले. आता जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका लागल्याच आहेत, यांत सुद्धा लिडर कम डीलर हे मतदारांची खरेदी विक्री चा लिलाव हेच होणार आहे.

हल्लीच्या निवडणूका म्हणजे चर्चा, विश्लेषण, मुद्दे, तर्कवितर्क यापलीकडच्या झाल्या आहेत. निवडणूका म्हणजे आता खुला बाजार झाला आहे. मत विकायला अनेक मतदार, तेही तथाकथित शिक्षित मतदार, डॉक्टर , इंजिनिअर, मोठ्या हुद्द्यावर असलेले अधिकारी, कर्मचारी,आपल्या कुटुंबातील इतर मतदारांच्या नावांची यादी घेऊन सगळे पक्ष कार्यालय फिरताना दिसले. आणि सध्या ही येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत हेच पहायला मिळनार यात तिळमात्र शंका नाही. मागील वर्षी पार पडलेल्या लोकसभेला, विधानसभेला अनेकांनी भाजपला नावे ठेवली, त्यांना विविध प्रकारच्या माध्यमातून अक्षरशः झोडपले. पण इथे प्रमुख विरोधी पक्ष तरी कुठे धड आहेत. त्यांनीही वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या युत्या, आघाड्या करून सोयीने भूमिका घेतल्या. बरं सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही नालायक ठरवावेत तर मतदार तरी कुठे प्रामाणिक राहिलाय? दोन दा चे जेवण आणि बुथ मध्ये नागडा होईस्तोवर दारू ढोसण्या रॅली, सभा अशा प्रत्येक ठिकाणी भाडोत्री गर्दी जमवली जात आहेच; पण खुद्द मतदान देखील विकत घेण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.मग ते रोकड स्वरूपात कींवा वस्तू स्वरूपात असो, राजकीय पक्षांची, नेत्यांची विश्वासार्हता संपल्याने फक्त खरेदी-विक्रीचा बाजार उरलाय. लोककेंद्री मुद्दे, सद्य राजकीय परिस्थितीवर चिंतन घडवून आणणारे विचार राजकीय पटलाबाहेर फेकले गेले आहेत. खरेदी-विक्रीचा बाजार झालेल्या निवडणूक प्रक्रियेतून पुढे येणारे लोकप्रतिनिधी हे "लीडर" नव्हे तर विकास निधीचा लिलाव करून टक्केवाऱ्याद्वारे आपला खर्च वसूल करणारे "डीलर" असणार आहेत. या सगळ्यांस प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेवटी जबाबदार कोण तर अर्थात आपण लोक, तुम्ही-आम्ही. हेच सर्व. आपण सर्व लोक जर लोकशाहीशी प्रामाणिक राहणार नाहीत तर अशा लोकशाहीतील लोकप्रतिनिधी मतदारांशी प्रामाणिक कसे राहतील ? आपण अशाच लोकशाहीस पात्र आहोत काय? हीच आपली लायकी आहे काय ? हा संशोधनासह आत्मचिंतनाचा विषय असुन सध्या यावर कुणी आपले विचार, मत, आणि भाष्य, प्रबोधन करतांना दिसुन येत नाही. जर यापुढे अशाच प्रकारे निवडणुका पार पडल्या तर नक्कीच लोकशाही लोप पावली म्हणून समजा, फक्त औपचारिकता म्हणून स्मशानात तीला जाळली जाऊ नये?

# शेतकऱ्याने विष प्राशन करून जीवन संपविले

**विदर्भ केसरी।**

**झरी जामणी :** तालुक्यातील भेंडाळा परिसरात सलग पिकांची नासाडी, आर्थिक अडचणी आणि कर्जाच्या तणावातून एका तरुण शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना १५ जानेवारी रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून शेतकरी कुटुंबाच्या दुःखात भर पडली आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव मारुती नानाजी तुरणकर (वय ३५, रा. भेंडाळा) असे असून ते शेतीवरच उदरनिर्वाह करत होते. गेल्या काही हंगामांपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे त्यांच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सततची नुकसानभरपाई न मिळाल्याने व वाढत्या कर्जबाजारीपणामुळे ते मानसिक तणावाखाली होते, अशी माहिती कुटुंबीयांकडून देण्यात आली. घटनेच्या दिवशी मारुती तुरणकर हे नेहमीप्रमाणे शेत परिसरात गेले होते. बराच वेळ परत न आल्याने त्यांच्या भावाने शोध घेतला असता ते शेतात विष प्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच मुकुटबन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून आत्महत्येप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, भेंडाळा व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकनुकसानीस तातडीने मदत, कर्जमाफी आणि मानसिक आधाराची गरज असल्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शासनाने त्वरित दखल घेऊन मृत शेतकरी कुटुंबाला आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणीही होत आहे.



# गोगरी येथील शेतकऱ्यास तालुका कृषी अधिकारी यांची मारहाण

### शेतकऱ्यांची पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल

**विदर्भ केसरी। मंगरूळपीर :-**

तालुक्यातील गोगरी येथील युवा शेतकरी ऋषिकेश पवार यांना मंगरूळपीर तालुका जिल्हा वाशिम येथील तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी मारहाण केल्याच्या घटनेची संपूर्ण राज्यभरातून निंदा होत आहे परंतु या प्रकरणी अद्याप पर्यंत तक्रार दाखल झाली नव्हती त्या मागचे अनेक कारणे होते. परंतु आज सामाजिक कार्यकर्ते तथा सावता परिषदेचे कार्याध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस वाशीम - मंगरूळपीर विधानसभा अध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी युवा शेतकरी ऋषिकेश पवार यांना पोलीस स्टेशनला घेऊन जाऊन या संबंधाची तक्रार दाखल केली व सचिन कांबळे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यासाठी ठाणेदार यांना लिखित स्वरूपात तक्रार दिली. यावेळी शेतकरी संघटनेचे श्रीकांत ठाकरे अतिश पाटील चौधरी पंकज इंगोले समाधान राऊत मयूर चव्हाण नरेश पवार आदी मंडळी उपस्थित हो

# 'विरंगुळा'तर्फे मकरसंक्रांतनिमित्त सूर्यनमस्कार



**विदर्भ केसरी। पुसद:-**

मकरसंक्रांती निमित्त येथील विरंगुळा योगकेंद्र ज्येष्ठ नागरिक भवन, पुसद येथे महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या वतीने सूर्यनमस्काराचे आयोजन सकाळी 6:30 वाजता करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान यवतमाळ जिल्हाध्यक्ष प्रा.गोविंद फुके,तर प्रमुख अतिथी संस्थापक अध्यक्ष डॉ.मनोज निलपवार, अँड.बाबुराव मस्के,विलास पलिकोंडावार, उपाध्यक्ष पंडित गादेवार होते.सर्वप्रथम योगशिक्षक डॉ.अविनाश जाधव, व रंजिता कन्नावार यांनी उत्तम रित्या नियमित योगवर्ग घेतला.योगऋषी महर्षी पतंजली याचे प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली, योग विद्या धाम नाशिक येथील योग गूरूजी विश्वासराव मंडलिक यांना राष्ट्रपती कार्यालयातून 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात दिल्ली येथे निमंत्रित केल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.या प्रसंगी स्वरचित स्वागत गित मंदा अघम यांनी सुमधूर आवाजात सादर करून योगसाधकांचे मने जिंकली. सूर्यनमस्काराचे मानवी जिवनात महत्व या विषयावर डॉ.मनोज निलपवार व मनोज नाईकसर यांनी मार्गदर्शन केले.त्यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मानचिन्ह व नियुक्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे सूर्यनमस्कार तज्ज्ञ प्रविण मस्के यांनी उपस्थित योगसाधकांकडून शास्त्रशुद्ध पध्दतीने 108 सूर्यनमस्कार मंत्रोच्चारणासह करवून घेतले.व सूर्याची उपासना केली. या भव्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज नाईकसर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.गोविंद फुकेसर यानी मानले. या कार्यक्रमास कोषाध्यक्ष गोपाल सातळे,गणेश पागिरे,भास्करराव व्यवहारे,डि..जी.तगडपलेवार, बालाजी माने,अभिलाष मस्के,साई वट्टमवार,भारत दहिफळे,जयंत राजूरकर,अँड. संतोष मुळे,उध्दव भगत, संजय मनवर, बालाजी माने,प्रकाश जयस्वाल,कल्पना मस्के,शैलेजा मडके,कांचन देशमुख, शालिनी पैकीने, रुचिता पुरी,विद्या गायकवाड, मनोरमा मनवर,छाया भगत, रुपाली सातळे,ज्योती कापूरे,अनिता गाडगे,अनंता गाडगे,अनंता पाटील, सुमेध खंदारे,अविनाश महाजन,भारत दहीफळे,शिवदास महाजन,गजानन पाली,इत्यादी असंख्य योगसाधक उपस्थित होते. चहापान व तिळगूळ लाडू वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### बाळापूर तालुक्यात लगबग; एकरी ६० ते ७० हजारांच्या खर्चाची तयारी

# उन्हाळी कांदा लागवडीची लगबग !



**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

> **खरिप हंगामात निसर्गाच्या अवकृपेमुळे महत्वपूर्ण असलेले सोयाबीन. तूर पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. तर रब्बी हंगामातील हरभरा. गहू पिकाची पेरणी झालेली आहे. तर कांदा लागवडीचे नियोजन करण्यात येत आहे त्यामुळे कांदा पीकांचे उत्पादन समाधानकारक होईल असी अपेक्षा आहे.**
> **- प्रविण लोखंडे कांदा उत्पादक शेतकरी.**

बाळापूर सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामातील उन्हाळा कांदा लागवडीची लगबग सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. इतर तालुक्याच्या तुलनेत बाळापूर तालुक्यात बागाईत क्षेत्र अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे रब्बी हंगामात गहू. हरभरा. उन्हाळी ज्वारी सह कांदा लागवडीचे क्षेत्र सुध्दा अधिक प्रमाणात राहते. सध्याच्या परिस्थितीत तूर पिकाचा कालावधी काही भागात जवळपास पूर्णत्वास असल्याने तूर पिकाची सोंगणी करून शेतात कांदा लागवडीसाठी आवश्यकतेनुसार मशागतीची कामे पूर्ण करण्यात येवून कांदा लागवडीचा काही भागात प्रारंभ तर काही भागात कांदा लागवडीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे रब्बी हंगामातील इतर पिकांच्या तुलनेत कांदा पिक महत्वपूर्ण समजले जाते. अडीच ते साडेतीन महिने कालावधीचे कांदा पीक असून कांदा लागवडीपासून कांदा काढणी पर्यन्त आंतरमशागत सह इतर अंदाजे जवळपास एक एकर क्षेत्रफळाला साठ ते सत्तर हजार रुपये खर्च अपेक्षित राहतो . दरम्यान निसर्गाची अवकृपा झाल्यास त्याचा कांदा पिकाला फटका बसून उत्पादनात घट निर्माण होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात राहते. तरी सुद्धा परिसरात कांदा उत्पादक शेतकरी कांदा पिकाचे भरघोस उत्पादन होवून बाजार पेठेत कांदा पिकाला समाधान कारक भाव मिळेल असे हिरवं स्वप्न उराशी बाळगून कांदा लागवडीसाची कामे जोमाने सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



# प्रियंका मालठाणे उपनगराध्यक्ष पदी

**विदर्भ केसरी। संघरतन सरदार**

अंजनगांव सुर्जी नगरपरिषद निवडणूक मध्ये जनतेने थेट भाजपा चे अविनाश गायगोले ला नगराध्यक्ष म्हणून निवडून आनले आणि काँग्रेस चे ९ नगरसेवक व अपक्ष एक , भाजपा चे ६,शिवसेना उबाठा चे ७, समाजवादी पार्टी चे २, आणि शिवसेना शिंदे गटाचे ३ नगरपरिषद सदस्य निवडून आले होते. राजकीय हालचाली मधून असं वाटत होतं की शिवसेना उबाठा यांच्या पाठिंब्याने काँग्रेस चा उपनगराध्यक्ष बसणार परंतु ऐनवेळी शिवसेना उबाठा व समाजवादी पार्टी सोबत दोस्तांना करून बीजेपी ने काँग्रेस च्या साथ खेळ केला .आणि बीजेपी नगरसेविका सौ. प्रियंका शंकर मालठाणे ला उपनगराध्यक्ष निवडले उपनगराध्यक्ष उमेदवार साठी काँग्रेस न शिवसेना उबाठा के बागी सुयोग उत्तमराव खाडे ला व शिवसेना शिंदे गटाकडून रामन्य रवींद्र आवंडकर निवडणूक रिंगणात उतरवले होते.

२८ नगरसेवकांमध्ये शिवसेना उबाठा आणि समाजवादी पार्टी पकडून १४नगरसेवक व नगराध्यक्ष ने भाजपा उमेदवार सौ. प्रियंका शंकर मालठाणे यांना १५ मत मिळवून उपनगराध्यक्ष बनविले आणि काँग्रेस सहयोगी बागी शिवसेना उबाठा चे उम्मीदवार सुयोग उत्तमराव खाडे ला ११, आणि शिवसेना शिंदे चे उम्मीदवार रामन्य रवींद्र आवंडकर ला ३ मत मिळाले शिवसेना उबाठा चे ७ मधुन ६ नगरसेवकांनी तर समाजवादी पार्टी च्या २ नगरसेवकांनी बीजेपीला मतदान केल्याने अंजनगांव सुर्जी मध्ये राजनैतिक समीकरण बदलून दिले. आमदार गजानन लवटे आणि खासदार अनील बोंडे यांची बैठकीचे फोटो सोशल मीडिया वर काही दिवसापासून वायरल झाली होती. त्यावेळीस शिवसेना उबाठा आणि बीजेपी ची दोस्ती होणार असल्याचे तर्क वितर्क लागताना होते.

चंद्रपूर

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

GOOD MORNING

## नगर परिषद, गडचिरोली कार्यालयाची पहिली सर्वसाधारण सभा संपन्न....!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : दि. १५ जानेवारी २०२६ नगर परिषद गडचिरोलीच्या उपाध्यक्ष पदाची निवडणूक आज नगराध्यक्ष सौ. प्रणोती निंबोरकर यांच्या अध्यक्षतेखाली नियमानुसार व शांततेत पार पडली. सदर निवडणूक प्रक्रियेत उपाध्यक्ष पदासाठी एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल झाल्याने श्री. निखिल चरडे यांची उपाध्यक्ष पदावर बिनविरोध निवड झाल्याचे पिठासिन अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नियोजित कार्यक्रमानुसार नगर परिषद सभागृहात ही पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. निवडणूक प्रक्रियेदरम्यान नामनिर्देशन, छाननी व निवड करण्याची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली. याच बैठकीत नगर परिषदेसाठी नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती देखील करण्यात आली. त्यानुसार भारतीय जनता पक्षाकडून श्री. सागर निंबोरकर व श्री. सुधाकर येनगंधलवार तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून श्री. नंदु कायरकर यांची नगर परिषदेचे नामनिर्देशित सदस्य म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर पिठासिन अधिकारी तथा नगराध्यक्षा यांनी नवनियुक्त उपाध्यक्ष, सर्व नगर सेवक तसेच स्विकृत सदस्य यांचे सत्कार केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. सदर निवडणूक व बैठक मुख्याधिकारी श्री. सुर्यकांत पिदुरकर तसेच नगर परिषदेच्या सर्व सन्माननीय नगरसेवकांच्या उपस्थितीत शांततापूर्ण वातावरणात पार पडली.

## संक्षीप्त











### नाटक हे समाज प्रबोधनाचे साधन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : मौजा पोर्ला येथे संगीत "कुंकू माखल रक्ताने" या नाटकाचे उद्घाटन करताना माजी आमदार डॉक्टर देवरावजी होळी, यावेळी उपस्थित माजी उपसभापती विलास केशवराव दशमुखे, माजी सभापती मारोतराव ईचोडकर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक हेमंत बोरकुटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बापूजी फरांडे, कनिष्ठ अभियंता विनोद दशमुखे, कनिष्ठ अभियंता वनकर, दीप्ती माटे, सचिन एनप्रेड्डीवार, अँड.अनिल चौधरी, अरुण अंडेल, अनिल शेडमाके, पंकज श्रृंगारपवार, सुनील कावळे, माजी सरपंच दीपक चुधरी, भास्करराव मेश्राम, संतोष दशमुखे, पांडूजी भोयर, पंकज येवले, ग्रामपंचायत सदस्य अजय चापले, रविजी सलोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# एटापल्ली येथे खनिज निधीतील विविध विकास कामांची जिल्हाधिका-यांकडून प्रत्यक्ष पाहणी

## महिला बचत गटांच्या उपक्रमांना प्रोत्साहन; कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या कामात दिरंगाईबाबत बांधकाम विभागावर नाराजी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत एटापल्ली तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांची जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी काल प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान दुर्गम भागातील महिला बचत गटांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक करत शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या तालुका दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी मौजा जीवनगट्टा येथे महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आळिंबी (मशरूम) उत्पादन उपक्रमास भेट देऊन पाहणी व मार्गदर्शन केले. जय पेरसापेन महिला बचत गटासह एकूण सहा महिला बचत गटांमार्फत उभारण्यात आलेल्या आळिंबी उत्पादन युनिटची पाहणी करताना त्यांनी उत्पादन प्रक्रिया, क्षमता व विक्री संधींचा सविस्तर आढावा घेतला. सर्व युनिट्सची उभारणी पूर्ण होऊन प्रत्यक्ष उत्पादन सुरू असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी असून यामधून नियमितपणे आर्थिक उत्पन्नाचा मार्ग खुला होत असल्याचे त्यांनी नमूद केले. दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जीवनगट्टा येथील आदिवासी लक्ष्मी महिला बचत गट केंद्रास भेट देऊन मोहफुलांपासून तयार होणाऱ्या विविध उत्पादनांची पाहणी केली. तसेच धिंगरी आळिंबी उत्पादन व विक्री केंद्रास भेट देत महिलांशी संवाद साधून बाजारपेठ जोडणी, मूल्यवर्धन व विक्री वाढीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महिला बचत गटाच्या अध्यक्षा वंदना गावडे यांनी बचत गटामार्फत मोहाचे लाडू, ज्वारीचे लाडू तसेच विविध पौष्टिक पदार्थ तयार करून देशभर विक्री केली जात असल्याची माहिती दिली. यानंतर बायफ मित्र संस्था, एटापल्ली येथील मत्स्यपालन संस्थेस भेट देऊन मत्स्यपालन साहित्याचे वितरण करण्यात आले. मौजा डुम्मे येथे डीएमएफ निधीतून मंजूर इंधन विहिरीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या शेतात पाहणी करण्यात आली. तसेच मौजा जवेली (म.) येथे शेतकरी श्रीमती हर्षा सुंदरशहा कुमरे यांच्या कुक्कुटपालन केंद्रास भेट देऊन उपक्रमाची प्रगती तपासण्यात आली.

### कौशल्य विकास केंद्र उभारणीच्या दिरंगाईबाबत नाराजी

■ एटापल्ली येथे खनिज निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी करताना जिल्हाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासकीय मान्यता मिळूनही व निधी उपलब्ध असूनही बांधकाम वेळेत सुरू न केल्याचे निदर्शनास आले. याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावून पुढील कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. विकासकामांमध्ये दिरंगाई व निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. दौऱ्याच्या शेवटी उपविभागीय कार्यालय, एटापल्ली येथे तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने व ठरविलेल्या कालमर्यादित कामे पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती प्रीती हिरळकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. इब्रान शेख, तहसीलदार हेमंत गांगुर्डे, गट विकास अधिकारी डॉ. आदिनाथ आंधळे, तालुका कृषी अधिकारी अरुण वसवाडे, एच. के. राऊत, समीर पेदापल्लीवार यांच्यासह विविध शासकीय अधिकारी-कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.










## २.९० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

### कत्तलीसाठी नेणा-या पाच गोवंशाची सुटका

भामरागड : कत्तलीसाठी गोवंशांना घेवून जाणाऱ्या बोलेरो वाहनासह एकूण २ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई ताडगाव पोलिसांनी नाकाबंदीदरम्यान गुरुवारी (दि. १५) केली. याप्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून पाच गोवंशांची सुटका करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार, ताडगाव पोलिस मुख्य चौकात रात्रीच्या वेळी नाकाबंदी करीत असताना भामरागडवरुन (एमएच ३३ टी ३४९३) क्रमांकाचे बोलेरो वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने येताना दिसले. सदर वाहन संशयित वाटल्याने पोलिसांनी बॅरेकेटस लावून सदर वाहनास अडवून पाहणी केली असता, डाल्यामध्ये ५ गोवंश (बैल) आढळून आले. या ज जनावरपांना अवैधरित्या शेजारच्या राज्यातील कत्तलखान्यात नेण्यासाठी निर्दयतेने कोंबून वाहतूक करीत होते. पोलिसांनी ९० हजार रुपये किंमतीचे गोवंश व २ लाख रुपये किंमतीचे वाहन असा एकूण २ लाख ९० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. चालक व्यंकटी पोचम उलेदला (रा. कमलापूर) व त्याच्या सोबती रजनीकांत सामय्या जिलापल्ली (रा. टेकडा ता. सिंरोचा), महेश व्यंकटी उलेदला (रा. कारवाईसाठी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी भामरागड अमर माहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि संगम गायकवाड, सफौ एकनाथ घोडाम, पोहवा रामगोपाल खवास, अविनाश आक्केवार, पोअं आकाश जुवारे, सुभाष समर्थ, ईश्वर वेलादी, देवेंद्र कोठारे, राहुल सोयाम, गोपाल मानकर, तुषार मोहुर्ले, मनीष कोकोडे, शुभम आडे यांनी केली. पुढील तपास ताडगाव पोलिस करीत आहेत. कमलापूर ता. अहेरी) यांच्याविरुद्ध पोस्टे ताडगाव येथे विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.



## शेंदुरसनी बनावट जन्म-मृत्यू नोंद प्रकरणात चौघांना अटक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

आर्णी : तालुक्यातील शेंदुरसनी गावात उघडकीस आलेल्या २७ हजारांहून अधिक बनावट जन्म-मृत्यू नोंदणी प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरवून सोडले होते. या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी यवतमाळ पोलिसांनी परराज्यात मोठी मोहीम राबवून आणखी चार सराईत आरोपींना अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. या कारवाईमुळे या मोठ्या रॅकेटमधील एकूण अटक आरोपींची संख्या आता ८ वर पोहोचली आहे.

केवळ १४०० लोकसंख्या असलेल्या शेंदुरसनी गावातील सरकारी सीव्हिल रेजीस्टेशन सिस्टीम (सीआरएस) पोर्टलच्या आयडी-पासवर्डचा गैरवापर करून सप्टेंबर २०२५ ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तब्बल २७,३९७ जन्म आणि ७ मृत्यूच्या बोगस नोंदी करण्यात आल्या होत्या. इतक्या मोठ्या प्रमाणात नोंदी झाल्याचे पाहून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलिसांनी विशेष पथके तयार करून बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात पाठवली होती. अनेक दिवसांच्या शोधानंतर पोलिसांनी अखेर प्रसुन प्रेमनारायण कुमावत (२२, रा. कानवन, ता. बदनावर, जि. धार, मध्य प्रदेश) असे मुख्य आरोपीच्या साथीदाराचे नाव असून त्याच्यासोबत ताबीश असगर अली (२७ रा. सिकराना, ता. ढाका, जि. मोतीहारी बिहार), संतोष रमाशंकर गुप्ता (२३, रा. पिपरा रामधर, जि. देवरीया उत्तर प्रदेश), शरद श्यामसुंदर जायसवाल (२५ रा.कानवन, ता. बदनावर, जि. धार, मध्य प्रदेश) यांना बेड्या ठोकल्या. या प्रकरणात उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या पथकाने यापूर्वी मुख्य सूत्रधार आदर्श कुमार दुबे याला बिहारमधून अटक केली होती. त्याच्या करण्यात आलेल्या चौकशीतून या गुन्ह्याचे जाळे अनेक राज्यांत पसरल्याचे समोर आले.

## 18 ते 60 या वयातील घरेलू कामगारांना नोंदणी करण्याचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : असुरक्षित तसेच घरेलू काम करण्याकरिता ठेवण्यात आलेला कामगार म्हणजेच घरेलू कामगार होय. घरेलू कामगार हे कायद्याच्या कोणताही भागामध्ये येत नाहीत. तसेच त्यांना काही लाभ मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे की, घरेलू कामगार हे कायद्याच्या एका भागात येतील त्यासाठी एक कायदा बनविण्यात आलेले आहे. त्या अधिनियमास महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम 2008 असे म्हणतात. या अधिनियमान्वये महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना दि. 12 ऑगष्ट 2011 रोजी करण्यात आलेली आहे. या मंडळांतर्गत वय वर्षे 18 ते 60 या वयातील घरेलू कामगार नोंदणी करण्यास पात्र आहेत. नोदंणी करीता आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत. घरमालकाकडे काम करीत असल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, राशन कार्ड, बँकेचे पासबुक, 2 पासपोर्ट फोटो मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना :- महिला घरेलू कामगार यांना पहिल्या दोन अपत्याकरीता प्रसुती लाभ योजना रक्कम रू. 5000/- घरेलू कामगारांच्या पाल्यास शैक्षणिक सहाय्य 300 /- रू. वयाचे 55 वर्षे पुर्ण झालेल्या घरेलू कामगाराना सन्मानधन योजनेतर्गत रक्कम रू. 10,000/- ( सदर लाभ एकदाच अनुदेय आहे.) घरेलू कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अंत्यविधी साठी रक्कम रू. 2000/- इतके अर्थसहाय्य. मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेले इतर लाभ. महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळातंर्गत नोंदणी करीता सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालय संकूल, बॅरेक क्र. 2, गडचिरोली या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून घरेलू कामगारांनी नोंदणी करून घ्यावी. असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचे मार्फत करण्यात येत आहे. असे सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली सिमा शिंदे यांनी कळविले आहे.

## कार्यालय जिल्हा वक्फ अधिकारी
## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अमरावती

१ला मजला, बि-विंग, गुलशन रेसीडेंसी, कॅम्प, अमरावती - ४४४६०२

Email: Tele: [illegible]

क्र. जि.व.का / चौकशी / ०१ /२०२६ दिनांक :- ९ जानेवारी २०२६

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता :- मस्जिद ए अबुबकर सिद्दीक, मु. पो. येवदा, ता. दर्यापूर जि. अमरावती. (MSBW/AMT/६७२/२०२५)**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार **मोहम्मद जुनैद मोहम्मद साहेब**, रा. अक्सा कॉलनी, मु. पो. येवदा, ता. दर्यापूर जि. अमरावती यांनी दिनांक. **१७/०९/२०२५** रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित **निवडणुकीद्वारे** अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मोहम्मद जुनैद मोहम्मद साहेब | अध्यक्ष |
| २. | मोहम्मद अतहर मोहम्मद उमर | उपाध्यक्ष |
| ३. | राजीक अहमद मोहम्मद सादिक | सचिव |
| ४. | फैय्याजोद्दीन जैनोद्दीन | खजिनदार |
| ५. | अयाजोद्दीन जहीरोद्दीन | सदस्य |
| ६. | अजीमोद्दीन जहीरोद्दीन | सदस्य |
| ७. | नसीमोद्दीन करीमोद्दीन | सदस्य |
| ८. | सैय्यद फारूक सैय्यद अफजल | सदस्य |
| ९. | अजीमोद्दीन करीमोद्दीन | सदस्य |
| १०. | खालीद नदीम अहमद निसार अहमद | सदस्य |
| ११. | शहाबोद्दीन निसारोद्दीन | सदस्य |
| १२. | मोहसिन जिक्कर घाणीवाले | सदस्य |
| १३. | मोहम्मद नईम मोहम्मद कासीम | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, **कार्यालय जिल्हा वक्फ अधिकारी अमरावती**, १ला मजला, बि-विंग, गुलशन रेसीडेंसी, कॅम्प, अमरावती-४४४६०२ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**(मोहम्मद रेहान)**
**जिल्हा वक्फ अधिकारी,**
**अमरावती**

## अमरावतीत रविवारी राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

### जय मल्हार मंगल योग २०२६' पुस्तिकेचे होणार प्रकाशन; दिग्गज नेत्यांची मांदियाळी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मूर्तिजापूर : धनगर समाजातील उपवधू-वरांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि सामाजिक ऋणानुबंध दृढ करण्याच्या उद्देशाने अमरावती येथे राज्यस्तरीय धनगर समाज उपवधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा येत्या रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मोर्शी रोडवरील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे पार पडणार आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे समाजातील उपवधू-वरांची सविस्तर माहिती असलेल्या 'जय मल्हार मंगल योग २०२६' या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी आमदार हरीदास भदे अकोला भूषविणार असून, उद्घाटन विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.



प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमाला माजी आमदार अनंतकुमार पाटील, माजी जि.प. अध्यक्ष पुरुषोत्तम डाखोडे, प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. सुभाष ढवळे, 'दैनिक विदर्भ मतदार'चे संपादक . ॲड. दिलीपभाऊ एडतकर राष्ट्रवादी काँग्रेसचे (ग्रामीण) अध्यक्ष मा. संतोष महात्मे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

### राजकीय दिग्गजांची सोहळ्यात मांदियाळी

■ या सोहळ्याला सदिच्छा भेट देण्यासाठी अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, विधान परिषदेचे आमदार मा. संजय खोडके, आमदार सुलभा खोडके आणि बडनेराचे आमदार मा. रवी राणा उपस्थित राहणार आहेत. समाजातील जास्तीत जास्त उपवधू-वर आणि त्यांच्या पालकांनी सपरिवार उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समिती, राज्यस्तरीय धनगर समाज, अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली
GOOD MORNING

## पोलिसांनी आवळल्या मुसक्या, तोतयागिरी करून पैसे घेणाऱ्यांचा पर्दाफाश

मारेगाव : स्वतःला 'एलसीबी' पोलिस असल्याचे सांगून सामान्य नागरिकांवर रुबाब झाडणाऱ्या आणि पैशांची उधळपट्टी करणाऱ्या भामट्यांच्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केले. लाखापूर येथील एका शेतकऱ्याला हॉटेलमध्ये बेदम मारहाण करून, त्यांच्या घरापर्यंत पाठलाग करत वडिलांना धमकावून पैसे उकळणाऱ्या तीन तोतया पोलिसांना पोलिसांनी वणी-मारेगाव मार्गावर नाकाबंदी करून अटक केली. तालुक्यातील लाखापुर येथे शेती करणारे मंगेश दिलीप मेश्राम वय ३० , रा. लाखापुर हे मित्रासोबत चहा पिण्यासाठी हॉटेलवर थांबले होते. अशात कार क्रमांक एमएच-३२-एक्स-६२५४ हॉटेल समोर येऊन थांबली. कारमधून उतरलेल्या तिघांनी हॉटेलमधील खुर्चीवर पाय पसरून बसत दादागिरी सुरू केली. या वेळी मंगेश मेश्राम यांनी खुर्चीवर नीट बसण्याची विनंती केली. मात्र याच क्षणी तिघांनी 'आम्ही एलसीबी पोलिस आहोत' अशी खोटी ओळख देत, 'तू आम्हाला शिकवतोस का?' असे म्हणत मंगेश यांना थापड, लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत खाली पाडले. वाद निर्माण होत असल्याचे बघून मंगेश घरी निघून गेला. दरम्यान हे तिघे एवढवरच थांबले नाही त्यांनी त्याचा पाठलाग करून घर गाठले व वडीलांना धमकावत कारवाईची भीती दाखवून १,५०० रुपये घेतले. त्यानंतर हे तिघेहीजण कारने तेथून पळून गेले. दरम्यान आरोपी तोतया पोलिस असल्याचे निष्पन्न झाल्यावर मंगेश याने पोलिस ठाण्यात तक्रार केली.

## संक्षीप्त







### कबड्डीच्या प्रत्येक झेपेत आत्मविश्वास, रांगोळीच्या प्रत्येक रेषेत संस्कार : आमदार डॉ. मिलिंद नरोटे

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

धानोरा : धानोरा तालुक्यातील मौजा सोडे (ता. धानोरा) येथे आदिवासी नवयुवक बहुउद्देशीय संस्था व बालवीर क्रीडा मंडळ यांच्या पुढाकारातून आयोजित 'भव्य प्रौढांचे खुले कबड्डी व रांगोळी स्पर्धा २०२६' चे उद्घाटन आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.
मार्गदर्शन करतांना सांगितले की, ग्रामीण प्रतिभेला व्यासपीठ, युवांना दिशा आणि भगिनींच्या कलेला सन्मान देणाऱ्या अशा उपक्रमांना माझे नेहमीच ठाम पाठबळ राहील. मैदानावरचा जोश आणि रांगोळीतून साकारलेली कला पाहून खऱ्या अर्थाने ग्रामसंस्कृतीचे वैभव अनुभवता आले. यावेळी माजी जि.प. उपाध्यक्ष मनोहरजी पोरेटी, आदिवासी सेवक देवाजी तोफा, भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष अनिलजी तिडके, भाजपा तालुकाध्यक्ष साजनजी गुंडावार, मल्लिकजी बुधवानी व मान्यवर उपस्थित होते.





### बळीराजाच्या समृद्धीसाठी आम्ही कटिबद्ध!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

धानोरा : धानोरा येथे म.रा.सह. आदिवासी विकास महामंडळ (TDC) अंतर्गत 'आधारभूत किंमत धान्य खरेदी केंद्राचे' उद्घाटन पार पडले. शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेल्या सोन्याला योग्य भाव मिळवून देणे आणि त्यांची मध्यस्थांच्या जाचातून सुटका करणे, हेच आमचे ध्येय आहे. प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून हे केंद्र सुरू केल्याचा आनंद आहे. असे प्रतिपादन आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी केले आहे. यावेळी भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष अनिल तिडके, भाजपा तालुकाध्यक्ष साजनजी गुंडावार, भाजपा जिल्हा सचिव सारंगजी साळवे, भाजप तालुका महामंत्री शुभाषजी धाईत, कोशाध्यक्ष सुभाषजी खोबरे, TDC चे हेमंतजी सोनवणे व पदाधिकारी उपस्थित होते.



### कमलापूर वनपरीक्षेत्रातील राजाराम (खांदला) अवैध अतिक्रमण करताना टॉक्टर जप्त

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अहेरी / राजाराम :- उपवनसंवरक्षक वन विभाग सिरोंचा नवलकिशोर रेड्डी व... पि. व्ही. रेड्डी उपविभागीय वनअधिकारी अहेरी, जी. जी. गडमडे, वनपरीक्षेत्र अधिकारी कमलापूर. यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. सिरोंचा वनविभाग अंतर्गत येत असलेल्या कमलापूर परीक्षेत्रातील राजाराम उपक्षेत्र हद्दीतील नियतक्षेत्र चिरेपल्ली येथे अवैध अतिक्रमण करत असताना वन विभागाला गुप्त माहिती मिळताच घटनाथली जाऊन जंगलगस्त करीत असताना वन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना पाहून त्या ठिकाणीवरुन आरोपी पसार झाले आहेत. त्या ठिकाणी वरुन असलेल्या ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहे. या वेळी उपस्थित. जी. एच. टेकाम, वनरक्षक चीरेपल्ली, एन, आर. सिडाम, वनरक्षक गोलाकर्जी, अर्जुन पेंदाम, सचिन आईचंवार यांनी मोक्यावर जाऊन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहे.

# 'त्या' वृद्धाची हत्या जुन्या वैमनस्यातून : दोघे अटकेत

## नेलगुंडा येथील खूनप्रकरणाचा पोलिसांकडून उलगडा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

भामरागड : तालुक्यातील नेलगुंडा येथे शेतात झोपेत असलेल्या वृद्धाची अनोळखी व्यक्तीने हत्या केल्याची घटना शनिवारी (दि. १०) उघडकीस आली होती. घरगुती जुन्या वैमनश्यातून सदर हत्या करण्यात आल्याची शंका व्यक्त होत होती.

अखेर नेलगुंडा पोलिसांनी या हत्येचा उलगडा करीत दोन आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. प्रकाश विज्या वाचामी (२३) व दिपक दोगे वड्डे (२४) दोघेही (रा. नेलगुंडा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. नेलगुंडा येथील पूसू नारंगो हक्के (७९) त्यांची पत्नी दसरी पुसू हबके हे गावालगत असलेल्या आपलेल्या शेतात झोपले होते. दरम्यान १० आरोपींना सुनावली दोन दिवसांची पोलिस कोठडी जुन्या वैमनस्यातून तसेच अधुनमधून होणाऱ्या वादविवादातून रागाच्या भरात कुऱ्हाडीने गळ्यावर वार करीत ठार केल्याची त्यांनी कबुली दिली. दोन्ही आरोपींना गुरुवारी (दि. १५) भामरागड न्यायालयात हजर केले असता आरोपींना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. हत्येचा उलगडा करण्यात भामरागड उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक अमोल सोळुंके, विक्रम बुरंगे, पतिराम मडावी, ज्ञानेश्वर मडज्ञवी, प्रशांत चुधरी, बाबुराव पल्लो, गणेश शिर्गावार, हर्षल धानोरकर, अक्षय बामणवाडे, संजय चव्हाण आदींनी महत्वाची भूमिका बजाविली. जानेवारीच्या रात्री अनोळखी व्यक्तीने पुसु हक्के यांची कुऱ्हाडीने गळ्यावर वार करुन हत्या केली होती. यासंदर्भात नेलगुंडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. हत्या जुन्या वैमन्यस्यातून केल्याची चर्चा होती. पोलिस उपनिरीक्षक अमोल सोळुंके यांच्या मार्गदर्शनात या हत्यचा छडा लावण्याच्या दिशेने चौकशी करीत काही संशयितांना ताब्यातही घेण्यात आले होते. यातील प्रकाश वाचामी व दिपक वड्डे या दोघांची सखोल चौकशी केली असता त्यांनी हत्येची कबुली दिली




## लोहखनिज वाहतूक करणाऱ्या ट्रकने टेम्पोला धडक देत केला पोबारा

### गावकऱ्यांनी पाठलाग करून ट्रक पकडला...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : गडचिरोली जवळील येवली येथे लोहखनिज वाहतूक करणाऱ्या वेगवान ट्रकने टेम्पोला जबर धडक देऊन अपघात घडवला. मात्र अपघातानंतर थांबण्याऐवजी ट्रकचालकाने ट्रकसह पोबारा केला. ही घटना आज बुधवार, 15 जानेवारी रोजी घडली. अपघातात टेम्पोचालक किरकोळ जखमी झाला असून वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, गडचिरोलीकडून येणारी 'छोटा हत्ती' टेम्पो (क्रमांक एमएस 33 टी 4961) येवली परिसरात असताना समोरून येणाऱ्या लोहखनिज वाहतूक करणाऱ्या ट्रकने (क्रमांक सीजी 08 एएस 5222) तिला जोरदार धडक दिली. या अपघातात टेम्पोचालक राजू सोनटक्के हे किरकोळ जखमी झाले.







अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळी न थांबता भरधाव वेगाने पळ काढला. मात्र संतप्त गावकऱ्यांनी तत्काळ पाठलाग करत डोंगरगाव परिसरात संबंधित ट्रक पकडला. त्यावेळी ट्रकचालकाने ट्रक सोडून पळ काढल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, येवली-डोंगरगाव मार्गावर लोहखनिज वाहतूक करणाऱ्या ट्रकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून, वेगावर कोणतेही नियंत्रण नसल्याने अपघातांची मालिका सुरु आहे. यापूर्वीही या मार्गावर गंभीर अपघात होऊन जीवितहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. आजच्या अपघातामुळे पुन्हा एकदा लोहखनिज वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## कोरची-बेडगाव घाटामध्ये ट्रक पलटला

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी




कुरखेडा : बेडगाव-कुरखेडा मार्गावरील कोरची-बेडगाव घाटामध्ये रात्रीच्या सुमारास ट्रॅक पलटल्याने वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. ट्रक रस्त्यावर आडवा पडल्याने केवळ दुचाकी वाहनेच कशीबशी मार्गक्रमण करु शकत असून चारचाकी व अवजड वाहनांसाठी मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. सदर घाट मार्ग हा नेहमीच जड व अवजड वाहतुकीसाठी ओळखला जातो. या मार्गावरुन छत्तीसगड व अन्य राज्यांकडून मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक करणारी वाहने ये-जा करीत असतात. परिणामी येथे वारंवार लहानमोठे अपघात घडत असून मागील काही वर्षांत ट्रक पलटी, ब्रेक फेल झाल्याने अवजड वाहनांची धडक, तसेच दुचाकी व लहान वाहनांचे अपघात सातत्याने घडले आहेत.

या ट्रक पलटीच्या घटनेमुळे कोरची-कुरखेडा बस सेवा कालपासून बंद असून शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालयांतील कर्मचारी व प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. विशेष म्हणजे, कधीकधी कोरची येथून रुग्णांना तातडीने कुरखेडा किंवा गडचिरोली येथे स्थलांतरित करावे लागते. मात्र सध्या मार्ग पूर्णतः बंद झाल्याने आरोग्यविषयक गंभीर प्रश्नही निर्माण झाला आहे, अशी चिंता नागरिकांतून व्यक्त होत आहे. सदर ट्रक तात्काळ हटवून मार्ग वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी जोर धरू लागली असून नेमके केव्हा हा मार्ग सुरळीत होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'सीओं'नी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : पीएम श्री पंडित जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा, रामनगर, गडचिरोली येथे नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुर्यकांत पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना नायलॉन/चायनीज मांजा तसेच प्लास्टिक पतंग यांच्या वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या अद्ययावत आदेशांनुसार नायलॉन व चायनीज मांजाच्या वापरावर असलेल्या बंदीची माहिती विद्यार्थ्यांना देत त्यामागील कारणे स्पष्ट करण्यात आली.

यावेळी नगर परिषदेचे शहर समन्वयक यांनी विद्यार्थ्यांना कथेच्या स्वरूपात मार्गदर्शन करून नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी, नागरिक तसेच पर्यावरणाला होणाऱ्या गंभीर हानीबाबत प्रभावीपणे जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी सदर मार्गदर्शनातून प्रेरणा घेत नायलॉन मांजा वापरणार नाही, तसेच इतरांनाही याबाबत जागरूक करणार असल्याची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सुधीर गोहाने, शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली व स्वच्छतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.







## वाहन भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबत इच्छूक वाहन धारकाना संपर्क करण्याचे आवाहन

गडचिरोली : प्रस्तुत समितीच्या दक्षता पथकास अभिलेख पडताळणीकरीता (बोलेरो, सन मॉडेल 2024 - 25 चे ) या दर्जाचे वाहन भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबत इच्छूक वाहन धारकाना आवाहन करण्यात येत आहे. तरी, इच्छुक वाहन पुरवठा धारकानी निविदाकरीता व अधिक माहीती करीता दिनांक 16 जानेवारी 2026 ते दिनांक 27 जानेवारी 2026 या कालावधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गडचिरोली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आयटीआय चौक, एनआयसी रोड, गडचिरोली येथे कार्यालयीन वेळत प्रत्यक्ष किंवा (07132-296181) भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. असे डॉ. सचिन एस. मडावी संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गडचिरोली यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्रात देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू

## महिलांच्या आरोग्यासाठी ऐतिहासिक पाऊल

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

> जिल्हा महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथे रजोनिवृत्ती झालेल्या महिलांसाठी दर बुधवारी बाह्यरुग्ण विभागात विशेष सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
> या क्लिनिकच्या माध्यमातून तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हॉर्मोन तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
> **-श्रीमती मेघना बोर्डीकर**, आरोग्य राज्यमंत्री

> मेनोपॉज हा आजार नाही, तर महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. मात्र या टप्प्यात महिलांना शारीरिक आणि मानसिक आधाराची अत्यंत गरज असते. राज्यातील प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, यासाठीच मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत. महिलांचे आरोग्य मजबूत झाले, तर कुटुंब, समाज आणि राज्य नक्कीच सक्षम होईल.
> **-डॉ. वर्षा लहाडे**, जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली

गडचिरोली : महिलांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवत, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये माननीय राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात आले आहेत. मकरसंक्रांतीनिमित्त महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, खऱ्या अर्थाने महिलांच्या आरोग्याची गोड भेट राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सर्व महिलांना दिली आहे. या उपक्रमाबद्दल संवेदनशील महिला व आरोग्यदृष्टी असलेले नेतृत्व यासाठी महिलांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे कौतुक केले असून त्यांच्याप्रती आभार देखील व्यक्त केले आहेत. मेनोपॉज म्हणजे महिलांच्या आयुष्यातील अत्यंत जिव्हाळ्याचा व संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोनल असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी महिलांसाठी विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला. महत्वाची बाब म्हणजे, देशात प्रथमच अशा प्रकारचे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत महाराष्ट्राने घेतलेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. जिल्हा महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथे रजोनिवृत्ती पश्चात (मेनोपॉज) क्लिनिकचे उद्घाटन नवनिर्वाचित नगरसेविका तथा आरोग्य सभापती वर्षाताई शेडमाके यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर कार्यक्रम डॉ. वर्षा लहाडे (जिल्हा शल्य चिकित्सक), डॉ. प्रताप शिंदे (जिल्हा आरोग्य अधिकारी) व डॉ. माधुरी किलनाके (वैद्यकीय अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमास आरोग्य विभागातील विविध अधिकारी व तज्ञ तसेच कर्मचारी उपस्थित होते. रजोनिवृत्ती हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा पण दुर्लक्षित टप्पा आहे. हार्मोनल बदलांमुळे होणारे शारीरिक त्रास, मानसिक अस्वस्थता, हाडांचे आरोग्य, हृदयाचे संरक्षण व एकूण जीवनमान याकडे समग्र दृष्टीने पाहणे आवश्यक असते. मेनोपॉझ क्लिनिकमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली वैयक्तिक समुपदेशन, योग्य तपासण्या, उपचार व जीवनशैलीविषयक सल्ला देऊन महिलांना या टप्प्यात निरोगी, आत्मविश्वासपूर्ण व सशक्त जीवन जगण्यासाठी सक्षम केल्या जाईल.










# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे.
लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी
आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर
उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
**जिल्हा प्रतिनिधी**
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
**जिल्हा प्रतिनिधी**
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
**जिल्हा प्रतिनिधी**
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
**जिल्हा प्रतिनिधी**
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
**जिल्हा प्रतिनिधी**
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
**संगणक चालक पेज डिझायनर.**
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**